# कृषीवल

रायगड, शनिवार, दि. २२ जून २०२४

किंमत ४ ₹





## आयोगाकडून विधानसभेची तयारी

**नवी दिल्ली :** लोकसभा निवडणुकीनंतर केंद्रीय निवडणूक आयोगाकडून विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू करण्यात आली आहे. महाराष्ट्र, हरियाणा, झारखंड आणि जम्मू-काश्मीर राज्यांच्या विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. आयोगाने निवडणूक याद्या अद्ययावत करण्यासाठी अधिसूचना जारी केली आहे. घरोघरी जाऊन मतदार याद्या अद्ययावत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. आगामी २५ जूनपासून म्हणजेच येत्या चार दिवसांपासून निवडणुकीच्या आधीची तयारी सुरु होणार आहे.

**आजचा अग्रलेख**
**परिक्षांचा बट्ट्याबोळ**

## वेधक

### अटल सेतूला तडे

**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते महायुती सरकारने मोठा गाजावाजा करत मुंबई आणि नवी मुंबईला समुद्रमार्गे जोडणाऱ्या अटल सेतूचे उद्घाटन केले होते. मात्र, अवघ्या काही महिन्यात अटल सेतूच्या रस्त्याची दुरवस्था झाल्याचे पाहायला मिळत आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी शुक्रवारी थेट अटल सेतूवर जाऊन या रस्त्याची दुरवस्था दाखवून दिली. रस्त्याला लांबच लांब भेगा पडल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. नाना पटोले म्हणाले की, बँकांकडून मोठी कर्ज काढून सरकार रस्तेबांधणी करते. जनतेची संपत्ती गहाण ठेवून कर्ज काढली जातात. मात्र, लोकांच्या जीविताशी खेळण्याचा प्रयत्न होत असल्याचे अटल सेतू मार्गावरील दुरवस्था दाखवून देत आहोत.

### 'नीटचा पेपर फुटलाच'

**नवी दिल्ली :** नॅशनल टेस्टींग एजन्सी म्हणजेच एनटीए मार्फत घेण्यात येणारी युजीसी-नीट परीक्षा रद्द करण्यात आली आहे. युजीसी नीट परीक्षेच्या पेपरफुटीवरुन मोठा वाद निर्माण झाला होता. त्यानंतर गृहमंत्रालयाने शिक्षण विभागाला युजीसी नीट परीक्षेत घोटाळा झाल्याचे सांगितले. त्यानंतर, शिक्षण मंत्रालयाने संबंधित नीट परीक्षेचा पेपर रद्द केला आहे. याप्रकरणी तपास करत असलेल्या सीबीआयने नीट पेपर फुटल्याचे म्हटले आहे. युजीसी नीट परीक्षेचा पेपर लीक झाला होता, परीक्षेच्या एक दिवस अगोदर हा पेपर लीक होऊन डार्कनेटवर टाकण्यात आला होता, असेही सीबीआयने म्हटलं आहे.

### ओबीसी आंदोलन जाणीवपूर्वक : जरांगे

**जालना :** दंगल घडवण्यासाठी सरकारने ओबीसी आंदोलन जाणीवपूर्वक उभं केल्याचा आरोप मनोज जरांगे यांनी केला आहे. यावेळी त्यांनी सरकारच्या शिष्टमंडळावर टीका केली. शिष्टमंडळ दोघांची फजिती करत असून, आम्हाला पाणी पाजून फसवलं असा संताप त्यांनी व्यक्त केला आहे. लक्ष्मण हाके यांनी ओबीसी आरक्षणाला धक्का लागू नये यासाठी आंदोलन सुरु केलं असताना मनोज जरांगे यांनी गंभीर आरोप केला आहे. जातीयवाद आणि दंगल घडवण्यासाठीच ही आंदोलनं उभी केली जात आहेत. मी ही लढाई होऊनच देणार नाही. गाव खेड्यातील एकाही ओबीसी, मराठा बांधवावर मी हात पडू देणार नाही. वेळ पडली तर मी एखादं पाऊल मागे घेईन, असेही जरांगे यांनी म्हटलं आहे.

## पावसाळी पर्यटन जीवावर
# चार पर्यटक बुडाले



### मोर्बे धरणाच्या साईबंधाऱ्यातील दुर्दैवी घटना



**। रसायनी । वार्ताहर ।**

**पावसाळी पर्यटन पर्यटकांच्या जीवावर बेतले असून, खालापूर तालुक्यातील पोखरवाडीनजीकच्या मोरबा धरणाच्या साई बंधाऱ्यात मुंबईतील चौघांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी (दि.२१) घडली आहे. यातील काही विद्यार्थी रिझवी कॉलेज बांद्रा, तर काही मुंबईच्या इतर कॉलेजातील असल्याचे समजते.**

मुंबईतील कॉलेजातील ३७ मित्रांचा ग्रुप शुक्रवारी सकाळी सोडाई किल्ल्यावर ट्रेकिंगसाठी आला होता. तेथून जवळच्या पोखरवाडी येथील मोर्बे धरणाच्या बंधाऱ्यात एकजण पाण्यात पोहण्यासाठी गेला. त्याला पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्यामुळे तो पाण्यात बुडत असताना त्याच्यासह त्याला वाचविण्यासाठी गेलेल्या तिघा मित्रांचाही पाण्यात बुडून मृत्यू झाला. यात ईशांत यादव (१९), आकाश धर्मदास माने (२६), रणथ महादू बंदा (१८), एकलव्य सिंग (१८) या चौघांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे. हे सर्वजण मुंबईतील विविध कॉलेजचे विद्यार्थी आहेत. ते बस क्रमांक एमएच-४७ वाय-२७९७ या लक्झरी बसने सोंडाई परिसरात ट्रेकिंगसाठी आले होते. यातील चौघे पाण्यात बुडाल्याची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम, खालापूर वरिष्ठ पोलीस अधिकारी मिलिंद खोपडे, एएसआय बहाडकर, वावर्ले तलाठी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. यावेळी अपघातग्रस्त मदत टीमचे गुरुनाथ साठेलकर यांच्या अपघातग्रस्त मदत टीमने स्थानिक नागरिकांच्या मदतीने चारही मृतदेह पाण्याच्या बाहेर काढले.

# सुवासिनींवर मधमाशांचा डंख

- **पोलादपूर तालुक्यातील निवे येथील घटना**
- **११ महिलांसह एका पुरुषालाही चावे घेतल्याने गंभीर जखमी**

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील चांभारगणी ग्रुप ग्रामपंचायतीच्या हद्दीतील निवे गावामध्ये सकाळी वटसावित्री पूजनावेळी वटवृक्षाभोवती जमलेल्या ११ सुवासिनींना मधमाशांचे मोहोळ उठून असंख्य मधमाशांनी कडकडून चावे घेतल्याची घटना शुक्रवारी (दि. २१) सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास घडली. यावेळी एका पुरुषालादेखील मधमाशांनी कडाडून चावे घेतले. या सर्व १२ मधुमक्षिका डंखाच्या रूग्णांना पोलादपूर ग्रामीण रुग्णालयामध्ये रूग्णवाहिकेने दाखल करण्यात आले असून, सर्वांच्या तब्येतील सुधारणा होत आहे.



पोलादपूर तालुक्यात सर्वत्र सुवासिनींचा वटसावित्रीपूजनाचा सण आनंदात आणि उत्साहामध्ये सुरू असताना अचानक पोलादपूर ग्रामीण रूग्णालयामध्ये तब्बल ११ महिला आणि १ पुरूष असे १२ जण मधमाशांच्या डंखाने बेजार झाल्याने दाखल करण्यात आल्याची माहिती थडकली. या बातमीने ग्रामीण भागातील सर्वच जण प्रचंड हवालदिल झाले. निवे गावातील वटवृक्षाखाली पाच-सहा महिलांची पूजा झाल्यानंतर आणखी चार-पाच जणी वटवृक्षाखाली पूजेसाठी जमल्या. यामुळे सर्वांच्या पूजेनंतर नारळ फोडण्यासाठी महिलांनी साधारण १०० फूट अंतरावर शेतात बांधांवरील गवताची बेणणी करणाऱ्या अनंत नाना तळेकर यांना हाक मारून बोलावून घेतले. यावेळी अनंत तळेकर यांनी नारळावरील सालं काढून तो फोडण्यासाठी आपटणार तोच हजारो मधमाशांनी त्यांना वेढले आणि चावे घेण्यास सुरूवात केली. यावेळी महिलांनादेखील मधमाशांनी डंख करण्यास सुरूवात केली. अशा अवस्थेत अनंत तळेकर यांनी जवळच्या मंदिरामध्ये सर्व महिलांना जाण्यास सांगून मंदिरात पोहोचल्यानंतर मंदिराचा दरवाजादेखील बंद करून घेतला. मात्र, तोपर्यंत महिलांना मधमाशांनी डोक्यावरील केसांमध्ये, चेहऱ्यावर तसेच हातावर आणि मानेवर दंश केल्याने सर्वांनाच वेदना असह्य होऊन त्या मंदिरामध्ये लोळू लागल्या.

> **निवे गावातील वटवृक्षाखाली पाच-सहा महिलांची पूजा झाल्यानंतर आणखी चार-पाच जणी वटवृक्षाखाली पूजेसाठी जमल्या. दरम्यान, झाडावर असणारे मधमाशांचे मोहोळ अचानक उठल्याने त्या माशांनी सुवासिनींवर हल्ला चढविला. यामध्ये त्या जखमी झाल्या असून, त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.**

यानंतर काही वेळाने मधमाशा पांगल्या आणि अनंत तळेकर आणि सर्व महिलांनी ग्रामस्थांशी संपर्क साधून पोलादपूर ग्रामीण रूग्णालयामध्ये सर्व १२ जणांना १०८ आणि १०२ रूग्णवाहिकेने दाखल केले. यावेळी १०८ रूग्णवाहिकेवरील डॉ. नागरे आणि चालक निकम तसेच १०२ वरील चालक किरण कळंबे यांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून रूग्णांना स्थानिक तरूणांच्या मदतीने पोलादपूर रूग्णालयामध्ये दाखल केले

पोलादपूर ग्रामीण रूग्णालयातील वैद्यकीय सहकाऱ्यांनी सुहासिनींपैकी वनिता बबन चिकणे, कविता नितीन चिकणे, दिपाली सचिन चिकणे, पार्वती भाऊ तळेकर, ज्योती जगदीश तळेकर, अनुसया गणपत तळेकर, सुशिला विश्वनाथ तळेकर, शेवंती पांडुरंग तळेकर, भारती बाबाजी तळेकर, गीता ज्ञानेश्वर तळेकर, शैला अनंत तळेकर आणि अनंत नाना तळेकर यांच्यावर तातडीने उपचार सुरू केले. यानंतर सर्वांच्या प्रकृतीत सुधारत असल्याचे वैद्यकीय परिचारिकांनी सांगितले आहे.

**रोहा सुरुंग स्फोट प्रकरण**
## फरारी आरोपींना अटक

**। चणेरा । प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील सारसोली गावालगत ओहल्याचे कातळ फोडण्यासाठी सुरुंग लावून कोणत्याही प्रकारची खबरदारी न घेतल्याने झालेल्या स्फोटात एका दहा वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाला, तर एक आठ वर्षीय मुलगा गंभीर जखमी झाल्याची घटना १४ जून रोजी घडली होती. या दुर्घटनेनंतर रोहा पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला होता. या दुर्घटनेतील फरार आरोपींचा शोध लावण्यात यश आले असून, आरोपींना गुरुवारी (दि.२०) आलिबाग न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

चणेरा भागातील सारसोली गावात १४ जून रोजी सुरुंग स्फोट होऊन खंदार आदिवासीवाडी येथील सुभाष रमेश पवार (१०) या मुलाचा मृत्यू झाला. आर्यन संजय जाधव (८) हा मुलगा गंभीर जखमी झाला आहे. या घटनेनंतर मंगेश गणेश पवार (रा. खंदार आदिवासी वाडी-चणेरा) यांनी रोहा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. जमीन मालक दत्ताराम कृष्णा चाळके व अन्य अज्ञात व्यक्तीविरोधात रोहा पोलीस ठाण्यात पान २ वर

**खूनप्रकरणी जन्मठेप**
## माणगाव न्यायालयाने ठोठावली शिक्षा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

किरकोळ वादातून सहकाऱ्यावर चाकूने हल्ला करून त्याला जखमी केले. उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. त्यामुळे आरोपी कृष्णा खेळोजी याला दोषी ठरवत न्यायालयाने त्याला खून केल्याप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा सुनावली. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी कृष्णा खेळोजी आणि मयत तुकाराम कावळे यांच्यामध्ये होडीमध्ये किरकोळ कारणावरून वाद झाले होते. श्रीवर्धन तालुक्यातील दिघी कोळीवाडा येथे ४ नोव्हेंबर २०२१ रोजी पहाटे साडेबारा वाजण्याच्या सुमारास आरोपी कृष्णा खेळोजी याने मयत तुकाराम याच्यावर चाकूने जीवघेणा हल्ला केला. त्याच्या चेहऱ्यावर छाती व पाठीवर चाकूने वार केला. त्यामध्ये तो गंभीर जखमी झाला. सरकारी दवाखान्यात उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. पान २ वर

## पहिल्या दिवशी पावसानं मैदान मारलं



- **पोलीस भरतीची मैदानी चाचणी पुढे ढकलली**
- **उमेदवारांची घेतली शारीरिक मोजमापे**

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड पोलीस दलातील पोलीस शिपाईसह बॅन्डस्मन आणि चालक या पदासाठी शुक्रवारपासून मैदानी चाचणीला प्रारंभ होणार होता. परंतु, मागील दोन दिवसांपासून सातत्यानं पाऊस पडत असल्यानं मैदानावर पाणी साचले आहे. परिणामी, पहिल्याच दिवशी होणारी मैदानी चाचणी पावसाच्या अडथळ्यामुळे उमेदवारांच्या सुरक्षेखातर रद्द करण्यात आली. मात्र, यादरम्यान उमेदवारांची शारीरिक मोजमापणी घेण्यात असून, प्रत्यक्ष मैदानी चाचणी एक जुलैपासून घेण्यात येणार असल्याची माहिती पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिली.

पोलीस होण्यासाठी गेल्या वर्षभरापासून तरुण-तरुणींनी सराव सुरू ठेवला होता. वेगवेगळ्या अकॅडमीच्या माध्यमातून पोलीस भरतीचे प्रशिक्षण देण्यात आले. शहरी भागासह ग्रामीण भागातील तरुण मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. पोलीस भरतीची तारीख कधी जाहीर होणार याकडे लक्ष लागून राहिले होते. अखेर ही उत्कंठा संपली. पान २ वर

## नऊ इमारती, ९९ घरे धोकादायक



● (छायाचित्र : संतोष पेरणे)

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत शहरातील धोकादायक इमारती आणि घरांचे सर्वेक्षण पालिकेने केले आहे. त्यात विविध भागातील नऊ इमारती आणि ९९ घरे धोकादायक ठरविण्यात आली आहेत. त्याचवेळी शहरातील मुद्रे भागात मागील वर्षांपासून दरडी कोसळण्याचा धोका वाढला आहे. त्यामुळे त्या भागातील आणि अन्य भागातील ७० घरे दरडीच्या छायेत पान २ वर



● पती-पत्नीचे नाते सात जन्म टिकावे यासाठी वटपौर्णिमेला अलिबागमधील सुवासिनींनी वडाची पूजा करुन पतीच्या दीर्घायुष्यासाठी सात फेरे मारत साकडे घातले. (छायाचित्र : समीर मालोदे)


**२७ वी पुण्यतिथी**



**कै. सावित्रीबाई गणपत घरत**

मृत्यू दि. : २२ जून १९९७, नागाव-उरण

**पुण्यतिथीनिमित्त भावपूर्ण आदरांजली**

नातवंडे श्री. नृपाल दत्तात्रेय घरत,
सौं. मृणालिनी घरत, पतवंडे कु. तनीश दंताळे, प्रतोष घरत.


**शाळांमध्ये विद्यार्थ्यांना योगाचे धडे**
# चिमुकल्यांच्या जोडीला शिक्षकांचे वज्रासन

**। अलिबाग प्रतिनिधी ।**

अभ्यास असो वा रोजचे खेळणे-बागडणे, मस्तीच्या दुनियेत नेहमीच रमणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये आज वेगळाच उत्साह पहायला मिळाला. निमित्त होते आंतरराष्ट्रीय योग दिनाचे. जिल्हाभरातील शाळांमध्ये शुक्रवारी (दि. २१) योग दिन साजरा करण्यात आला. चिमुकल्यांच्या जोडीला शिक्षकही योगासनात दंग झाल्याचे पाहायला मिळाले. दरम्यान, विविध शाळांमध्ये सकाळी विद्यार्थ्यांना योगांचे धडे देण्यात आले. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेऊन योगाचे प्रशिक्षण घेतले.



दरम्यान, आंतरराष्ट्रीय योग दिन जिल्हा प्रशासन, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि नेहरु युवा केंद्र व प्रिझम सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने साजरा करण्यात आला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, जिल्हा क्रीडा अधिकारी अंकिता मयेकर, नेहरु युवा केंद्र समन्वयक निशांत रौतेला, राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी तपस्वी गोंधळी, क्रीडा अधिकारी सचिन निकम, श्री अंबिका योग कुटीर या संस्थेचे प्रशिक्षक तसेच स्वयंसिध्दा सामाजिक विकास संस्थेचे स्वयंसेवक, प्रशिक्षणार्थी, पोलीस विभागातील कर्मचारी इत्यादी उपस्थित होते. दरम्यान, रायगड जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्येदेखील योग दिन साजरा करण्यात आला.

> **तणावमुक्त आणि निरोगी जीवनासाठी योगासन अतिशय महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रता निर्माण व्हावी, त्यांची मानसिक क्षमता वाढावी, यासाठी प्रत्येक शाळेतून योगाचे धडे देण्याचा प्रयत्न राहील.**
> **- पुनिता गुरव, शिक्षणाधिकारी, प्राथमिक**

योगातून एकाग्रता निर्माण होण्याबरोबरच मानसिक व शारीरिक क्षमता वाढविण्यास मदत होते. त्यामुळे धावपळीच्या युगात योगा महत्त्वाचे असल्याचे सांगण्यात आले. योगाचे फायदेही यावेळी सांगण्यात आले. त्यानंतर योगाचे प्रात्यक्षिक धडे विद्यार्थ्यांना देण्यात आले. योगाचे वेगवेगळे प्रकार विद्यार्थ्यांना शिकवून त्याचा नियमित वापर करण्याचा मोलाचा सल्लादेखील यावेळी देण्यात आला. रायगड जिल्हा परिषद शाळेसह जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी असे एक लाखाहून अधिक विद्यार्थी या उपक्रमात सहभागी झाले होते.

## पान १ वरून

## फरारी आरोपींना अटक

गुन्हा दाखल करण्यात आला होता. या घटनेतील अन्य दोन आरोपी फरार झाल्यानंतर पोलिसांनी तपासाचे चक्क वेगाने फिरवत आरोपी सातारा जिल्ह्यातील फलटण तालुक्यातील फडकेवाडी या गावात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी सापला रचून दत्तात्रेय जयसिंग यादव व सुभाष लक्ष्मण चव्हाण यांना सोमवारी (दि. १७) अटक केली.या दोन्ही आरोपींना गुरुवारी (दि.२०) न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. याप्रकरणी अधिक तपास पोलीस निरीक्षक देवीदास मुपडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक विनोद वायंगणकर करीत आहेत.

## माणगाव न्यायालयाने ठोठावली शिक्षा

याप्रकरणी दिघी सागरी पोलीस ठाण्यात कृष्णा याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीसन निरीक्षक एस.ए. पोमन यांनी करीत आरोपीविरोधात न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. या खटल्याची सुनावणी माणगावमधील अतिरिक्त सह जिल्हा व सत्र न्यायाधीश यांच्या न्यायालयात झाली. प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, वैद्यकीय अधिकारी यांची साक्ष महत्त्वाचा पुरावा ठरला. या खटल्यामध्ये अतिरिक्त शासकीय अभियोक्ता योगेश तेंडुलकर यांनी सरकारी वकील म्हणून काम पाहिले. विशेष व सत्र न्यायाधीश यु.टी. पोळ यांनी या घटनेतील गुन्हा सिद्ध झाल्यानंतर आरोपीला खून केल्याप्रकरणी दोषी ठरवून जन्मठेप अशी शिक्षा सुनावली.

## नऊ इमारती, ९९ घरे धोकादायक

असल्याचे जाहीर करण्यात आली आहे. कर्जत नगरपालिका हद्दीत सर्व धोकादायक इमारतींमधील कुटुंबांना तात्कळ स्थलांतरण करण्याच्या सूचना पालिकेने दिल्या आहेत. नगरपालिकेकडून त्या इमारतींवर धोकादायक असे फलक लावण्यात आले आहेत.कर्जत या १९९२ मध्ये नगरपालिका म्हणून अस्तित्वात आलेल्या शहरात पूर्वी ग्रामपंचायत होती. ग्रामपंचायत असताना कर्जत शहरात पूर्वी मोठ्या प्रमाणात वाडे होते. तर, काही प्रमाणात तीन मजल्याच्या इमारती होत्या. आता वाडे पाडले जाऊन मोठे टॉवर उभे राहात आहेत. मात्र, आजही शहरात मोठ्या काही जुन्या दुमजली इमारती असून, त्यांचे आयुष्यमान संपल्याने त्यांना कर्जत नगरपालिकेने धोकादायक ठरवले आहे. पालिकेने मागील चार महिने शहरातील सर्व जुन्या इमारती पालिकेने नेमलेल्या पथकाने केली.

त्या पथकात शहर अभियंतेदेखील होते. त्यानुसार अहवाल तयार करण्यात आल्यानंतर कर्जत नगरपालिका हद्दीमधील नऊ इमारती या धोकादायक ठरविण्यात आल्या आहेत. त्याचवेळी शहरातील ९९ घरेदेखील धोकादायक स्थितीत असल्याने त्यांना धोकादायक ठरविण्यात आले आहे. त्या सर्व घरांमध्ये राहणाऱ्या नागरिकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित व्हावे, असे पत्र आणि नोटीस पालिकेने बजावली आहे. नगरपालिकेने ज्या नऊ इमारती धोकादायक ठरविल्या आहेत, त्यामध्ये पिंपुटकर वाडा-दहिवली, नाझ व्हिला-दहिवली, तर मुख्य शहरातील तेलवणे बिल्डिंग, डागा बिल्डिंग, भुसारी चाळ, गुजराथी वाडा, प्रेमसिंधु अपार्टमेंट यांचा समावेश आहे. या सर्व इमारतींमध्ये ६२ नागरिक राहात असून, त्यांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित होण्याची नोटीस पालिकेने बजावली आहे. मागील वर्षांपासून दरडीच्या छायेत असलेल्या कुटुंबांनादेखील दरडी कोसळून अपघात होण्याचा धोका असल्याने नोटीस बजावण्यास सुरुवात झाली आहे. त्यात यावर्षी काही घरांची वाढ झाली असून, ७० घरांना दरडीच्या छायेत असल्याबद्दल नोटीस बजावली आहे. त्या सर्व सूचना धोकादायक इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांना कर्जत नगरपालिकेने दिल्याची माहिती पालिका मुख्याधिकारी वैभव गारवे यांनी दिली आहे. त्याचवेळी कर्जत पालिकेने धोकादायक ठरविण्यात आलेल्या इमारतींच्या आजूबाजूला राहणाऱ्या रहिवाशांनी आपली काळजी घ्यावी, असे आवाहन पालिकेकडून करण्यात आले आहे.

## पहिल्या दिवशी पावसानं मैदान मारलं

पोलीस होण्याचे स्वप्न उराशी बाळगत ३१ हजार ६३ उमेदवारांनी अर्ज भरले होते. रायगड पोलीस दलातील ४२२ जागांसाठी ही भरती आहे. शुक्रवारी (दि. २१) पासून २१ जूनपासून उमेदवारांच्या शारीरिक चाचणीला प्रत्यक्ष सुरुवात करण्याची तयारी सुरु केली. त्यासाठी लागणारी यंत्रणादेखील तैनात करण्यात आली. सुमारे २५० हून अधिक पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांची यासाठी नेमणूक करण्यात आली होती. नेहुली येथील जिल्हा क्रीडा संकुलमध्ये मैदानी चाचणी घेण्याची तयारी करण्यात आली. मात्र, गेल्या दोन दिवसांपासून जिल्ह्यात पावसाने दमदार सुरूवात केली. या पावसामुळे जिल्हा क्रीडा संकुलमधील मैदानात पाणी साचले असून, धावपट्टीमध्ये चिखल तयार झाला आहे. त्यामुळे मैदानी चाचणी न घेता शारीरिक मोजमाप घेण्यात आले. त्यामध्ये पुरुष उमेदवारांची उंची, छातीची तपासणी करण्यात आली.

**चुकीचा मार्ग स्वीकारू नका**

पोलीस भरतीला सुरुवात झाली आहे. पोलीस होण्यासाठी काही मंडळींकडून आमिष दाखवण्याचा प्रयत्न केला जाईल. काहींकडून पैशाची मागणी केली जाईल. जो कोणी चुकीच्या मार्गाने पोलीस होण्याचा प्रयत्न करताना आढळून आल्यास त्यांच्याविरोधात कारवाई केली जाईल. ही प्रक्रिया पारदर्शक व्हावी यासाठी यंत्रणा तैनात केली आहे. पोलीस होण्यासाठी चुकीचा मार्ग स्वीकारू नका, असा मोलाचा सल्ला पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिली.

**भरती पुढे ढकला**

पावसाचा हंगाम सुरु झाला आहे. या हंगामात पोलीस भरतीला सुरुवात झाली आहे. या कालावधीत मैदानी चाचणी देताना प्रचंड त्रास होण्याची शक्यता आहे. त्यामुळे ही भरती प्रक्रिया पुढे ढकलण्यात यावी, अशी मागणी यावेळी उमेदवारांनी भरतीच्यावेळी केली.

**मैदानी चाचणी एक जुलैला**

रायगड पोलीस दलातील मैदानीला चाचणीला शुक्रवारी सुरुवात करण्यासाठी तयारी करण्यात आली. मात्र, गेल्या दोन दिवसांपासून पाऊस सुरू आहे. या पावसामुळे उमेदवारांना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये याठी मैदानाची चाचणी पुढे ढकलण्यात आली आहे. त्यामध्ये धावणे, गोळा फेक व इतर मैदानी चाचणी एक जुलैला घेतली जाणार असल्याची माहिती पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिली.

**वेबसाईटवर उमेदवारांना माहिती मिळणार**

पोलीस दलातील भरतीला सुरुवात झाली आहे. सध्या पावसाचा हंगाम आहे. त्यामुळे उमेदवारांच्या सुरक्षेच्या दृष्टीने मैदानी चाचणी घेतली जाणार आहे. प्रत्येक उमेदवारांना रायगड पोलिसांच्या raigadpolice.gov.in या वेबसाईटवर माहिती दिली जाणार आहे.


### जाहीर नोटीस दिनांक : २२ जुन २०२४

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावरही नोटीस प्रसिध्द झाल्या पासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालका बरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे ताडवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र चौ.मी | आकार रु.-पै. |
|---|---|---|---|---|
| निकेत सुरेश घाटे | ५२/१ | २६ | २२५.०० | २२-५० |
| | ५२/१ | २७ | २२५.०० | २२-५० |
| | ५२/१ | २८ | ४३५.०० | ४३-५० |
| | प्लॉट नं. २८ वर बांधलेला बंगला ज्याचे क्षेत्र १५०.१३ चौ.मी कारपेट असे आहे. | | | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
सही -
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे, कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१
दिनांक : २२/०६/२०२४
मो.नं. ९१५८२७७७२८

**तहसिलदार तथा शेतजमिन न्यायाधिकरण कर्जत यांचे न्यायालयात**
**ता. कर्जत जि. रायगड**

कुळवहीवाट ३२ ग दावा क्र. १५/२०२४

**जाहीर पेपर नोटीस**

१. श्रीम. काळी रामा डायरे उर्फ शेवंती मधुकर लोभी
रा. बीड, ता. कर्जत, जि. रायगड — अर्जदार
२. श्रीम. ताई रामा डायरे उर्फ ताई धर्मा धुळे
रा. चांधई नसरापूर, ता. कर्जत, जि. रायगड
विरुध्द
१. श्री. सदाशिव भास्कर भिडे — सामनेवाले
रा. कर्जत ता. कर्जत जि. रायगड

तमाम जनतेस तसेच सामनेवाले/प्रतिवादी यांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे हेदवली, ता. कर्जत जि. रायगड या जमिन मिळकती संदर्भात ३२ ग अन्वये अर्ज दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये दिनांक २९/०२/२०२४ रोजी प्रथम सुनावणी घेण्यात आलेली आहे . मात्र सामनेवाले हे या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर दाव्याची पुढील सुनावणी दि. २४/०६/२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता तहसिल कर्जत जि. रायगड येथे निश्चित करण्यात आली आहे.

सबब या जाहीर नाटीशीद्वारे सामनेवाले यांना तसेच वरील जमीन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींना ७ दिवसांच्या आत तहसिल कार्यालय कर्जत, जि. रायगड येथे समक्ष येऊन आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे . सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**दावा मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| मौजे. हेदवली ता. कर्जत जि.रायगड | ९५/५ | ०.०६.०० | ०.१९ |

ठिकाण - कर्जत
दिनांक -१८/०६/२०२४
सही/-
**(डॉ. शीतल रसाळ)**
शेतजमीन न्यायाधिकरण
तथा तहसिलदार कर्जत

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे चौल, ता. अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीच्या विद्यमान मालक उषा यशवंत मांजरेकर आणि विनोदीनी जगन्नाथ पाटील, यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| चौल ता. अलिबाग | ३८९ | बागायत क्षेत्र ०-२७-९० पो.ख. ०-०१-५० एकुण ०-२९-४० | १४.५० |

वर वर्णन जमिन मिळकतीचे एकुण क्षेत्रा पैकी क्षेत्र ०-२१-६५ हे.आर. मध्ये उषा यशवंत मांजरेकर व विनोदीनी जगन्नाथ पाटील यांचा असणारा अविभक्त हिस्सा या नोटीसीचा विषय आहे.

सदरहू वर्णन केलली मिळकत निर्वेध, बोजा रहीत असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापी सदर मिळकतीत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कबजा, वारसाहक्क, मालकी, एम.ओ.यू. करार, ताबेकब्जा वहीवाट, रस्ता वहिवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात, प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तकार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजुन, गुहीत धरून सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. २१/०६/२०२४
मोबा. ९०२८८५१२८०
**ॲड. विराज शरद अंबुकर**
रा. हनुमान वाडी, थेरोंडा, पो. चौल
ता. अलिबाग, जि. रायगड

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसने कळविण्यात येते की, आमचे अशिल हे खालील वर्णनाच्या मिळकतीचे विद्यमान मालकाकडुन कायम खरेदी करणार असुन तशी बोलनी आमचे अशिल व मिळकतीचे मालक मध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मालकाचे नाव : १) काजी अ. रहिमान काजी महामुद पोकर
रा. मु. फळशेत कर्नाळा ता. तळा जि. रायगड

| मौजे | गट. नं | भो.ग. वर्ग | क्षेत्र(हे.आर) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|---|
| फळशेत कर्नाळा | १६८/८/क | १ | ०.५९.०० | ०.२७ |

तिचे कोणतेही भागावर कोणाचेही विकी गहाण, दान, भाडेपट्टा, विकीचाकरार, वारसा, हक्क, लिज, चाज, पोटगी, वहिवाट, (जाण्या येण्याचा मार्ग), इजमेंटरी या अथवा अन्य कोणत्याही हितसंबंध असल्यास अथवा कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीची विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी हरकत अगर तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत सही करणार यांचेकडे लेखी स्वरूपात योग्य ते कागदपत्रे पुराव्या सहीत सादर करावे. मुदतीत कोणत्याही प्रकारची तकार न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहित धरून आमचे आशिल व्यवहार पुर्ण करतील. व मागाहून कोणाचीही तक्रार हरकत राहिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही हे सर्वास कळावे.

माणगांव
दिनांक :- २०/०६/२०२४
सही/-
**(ॲड.पी.एम.जाधव)**
Adv. P. M. Jadhav
B.Com., LL.B.
At. Post. Indapur, Tal. Mangoan,
Dist. Ralgad.

### जाहीर नोटीस

**मुरूड येथील मे. तहसिलदार सो. यांचे न्यायालयात**

ज.म.र.अर्ज ९२/२०२४

संजय गोविंद मसाल ... अर्जदार
रा. मसाल गल्ली, मुरूड-जंजिरा
ता. मुरूड, जि. रायगड
विरुद्ध
मुख्याधिकारी,
मुरुड-जंजिरा नगरपरिषद, ... सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड.

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, अर्जदार यांची आई प्रमोदिनी गोविंद मसाल हिचा मृत्यु दि. ३/३/२०१४ रोजी गांव मुरुड, ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड येथे झालेला असून त्यांची मृत्यु नोंद मुरुड-जंजिरा नगरपरिषद यांचे गा.न.नं. १४ जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे मृत्यु नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ / मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांची आई प्रमोदिनी गोविंद मसाल यांचा मृत्यु दि. ३/३/२०१४ रोजी झालेबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलामार्फत मे. न्यायालयांत दि. १६/०७/२०१४ रोजी समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांना त्यांचे आईची मृत्यु नोंद जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरमध्ये होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यांत येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ११/६/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
**(रोहन शिंदे)**
तहसिलदार मुरुड-जंजिरा

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत जमीन मालक श्री. राजीव जैन यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे- बीड खुर्द, ता. खालापूर, जि. रायगड.**

| सर्व्हे नं./ हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|
| २३/८/ब | ०.३३.०० पो. ख. ०.०१.०० एकूण ०.३४.०० हे. आर. पॉ. | ०.५० |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास, सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचे कडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीशीच्या मुदतीत हरकत न आल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून, आमचे अशील सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक : २२/०६/२०२४
सही/-
**ॲड. निता नरेश बैलमारे**
मो. ९२२६३३१५२६
ऑफीस : शॉप नं. १५, सनराईज अपार्टमेंट,
कचेरी रोड, कर्जत, जि. रायगड -४१० २०१.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी श्री. संजीव शांताराम शिंदे, श्री. संदिप शांताराम शिंदे, रा. पुणे, श्रीमती श्वेता सुधिर दामले, रा. डोंबिवली खरेदी देणार व श्रीमती शिल्पा प्रताप गंभीर, रा. अलिबाग रायगड मान्यता देणार यांचेकडून त्यांचे मालकीची मौजे कवठेवाडी, तालुका कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीनीची मिळकत कायम खरेदी घेणेचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मौजे कवठेवाडी, तालुका कर्जत, जि. रायगड येथील मिळकतीचे वर्णन :**

| सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र हे. आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| २/९ | ०-५५-०० पो.ख. ०-०१-०० ०-५६-०० | ००=५० |

येणेप्रमाणे पर वर्णन केलेली शेतजमीनीची मिळकत तीमधील दगडमाती, झाडझाडोरा, पाणी जाण्यायेण्याचे मार्ग व हक्क, वहिवाटीचे व इजमेंटचे मार्ग व हक्क वगैरे तदंगभूत सर्व वस्तू, हक्क, हितसंबंध यासुद्धा.

वर वर्णन केलेल्या मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, पोटगी, कबजा, लिज, कुळवहिवाट, बोजा, ताबा, इजमेंट, साठेकरार लिएन अगर अन्य कोणत्याही स्वस्माचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून पंधरा दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह तसे लेखी कळवावे. सदर मुदतीत आमचेकडे कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजुन आमचे अशिल फरोक्ताचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर मागाहून उपस्थित केलेली कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाही व ती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक २१/०६/२०२४
सही/-
**श्री. प्रसन्न चंद्रकांत शिंदे**
बी. ए. एलएल. बी. ॲडव्होकेट
७५, अभिन, मु. भिसेगांव, पो. गुंडगे
ता. कर्जत, जि. रायगड.
फोन क्रमांक ८४४६९६४१११.



**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक सदाशिव रामचंद्र देशमुख यांचेकडून खरेली करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे कळंबोली, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग/ सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| २३/४ | ०-०९-१० हे आर पॉ | ०-५० |

या मिळकतीशी कोणत्याही इसमात्रा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेवी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हवक हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेत्री- विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २२/०६/२०२४
ॲड. निलेश कान्हु मोरे मोबा. ९८२२६९११०९
ॲड. वृषाली रघुनाथ मोरे मोबा. ८५३०१४३८५४
ऑफिस पत्ता - शॉप नं. २९, तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

### पनवेल महानगरपालिका
### जाहीर आवाहन

पनवेल महानगरपालिकेमार्फत आकारण्यात आलेल्या पूर्वलक्षी मालमत्ता कराबाबत मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल असलेल्या स्पेशल लीव्ह पिटीशन क्रमांक १०८४९/२०२३ मधील सिव्हिल अपील क्रमांक ६०६५/२०२४ संदर्भात अंतरिम निकाल दिनांक २९ एप्रिल २०२४ रोजी लागला आहे. सदर अंतरिम निकालानुसार करनिर्धारण वर्ष २०२१-२२ पासून मालमत्ता कराच्या सर्व थकीत रकमेचा भरणा दोन महिन्यांच्या आत करण्याचे निर्देश मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आहेत. या निर्णयानंतर महानगरपालिकेकडून सुधारित देयके तयार करण्यात येऊन वाटप करण्यात आलेली आहेत.

नागरिकांच्या सोयीसाठी खारघर भागातील खालील नमूद सोसायटी मध्ये आता महानगरपालिकेमार्फत मालमत्ता कर भरणा करण्यासाठी दिनांक २२ जून २०२४ पासुन शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे.

| अ. क्र. | सोसायटीचे नाव | शिबिराचा दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | निसर्ग ग्रुप हाईड पार्क को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी | २२/०६/२०२४ and २३/०६/२०२४ and २४/०६/२०२४ | ७.०० am ७.०० pm |
| २ | जलवायू डिफेन्स को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी | २२/०६/२०२४ and २३/०६/२०२४ and २४/०६/२०२४ | ७.०० am ७.०० pm |
| ३ | खारघर सेलिब्रेशन के एच ४ को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड | २२/०६/२०२४ and २३/०६/२०२४ and २४/०६/२०२४ | ७.०० am ७.०० pm |
| ४ | रघुनाथ विहारआर्मी को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी | २२/०६/२०२४ and २३/०६/२०२४ and २४/०६/२०२४ | ७.०० am ७.०० pm |
| ५ | स्पागेट्टी को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड | २२/०६/२०२४ and २३/०६/२०२४ and २४/०६/२०२४ | ७.०० am ७.०० pm |
| ६ | केसर गार्डन को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी | २२/०६/२०२४ and २३/०६/२०२४ and २४/०६/२०२४ | ७.०० am ७.०० pm |
| ७ | रेजन्सी गार्डन को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी | २९-०६-२०२४ and ३०-०६-२०२४ | ७.०० am ७.०० pm |
| ८ | केसर हार्मोनी को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी | २९-०६-२०२४ and ३०-०६-२०२४ | ७.०० am ७.०० pm |
| ९ | हावरे स्प्लेंडर को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी | २९-०६-२०२४ and ३०-०६-२०२४ | ७.०० am ७.०० pm |
| १० | पारिजात को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी | २९-०६-२०२४ and ३०-०६-२०२४ | ७.०० am ७.०० pm |
| ११ | भुमिराज वुड्स को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी | २९-०६-२०२४ and ३०-०६-२०२४ | ७.०० am ७.०० pm |
| १२ | कुंजविहार को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग लिमिटेड | २९-०६-२०२४ and ३०-०६-२०२४ | ७.०० am ७.०० pm |
| १३ | महालक्ष्मी को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड | २५-०६-२०२४ | ७.०० am ७.०० pm |
| १४ | मातृछाया को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड | २५-०६-२०२४ | ७.०० am ७.०० pm |
| १५ | वास्तुविहार के-एच २ को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड | २५-०६-२०२४ | ७.०० am ७.०० pm |
| १६ | प्रियदर्शनी को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड | २५-०६-२०२४ | ७.०० am ७.०० pm |
| १७ | हेक्स ब्लॉक्स को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड | २५-०६-२०२४ | ७.०० am ७.०० pm |
| १८ | जलवायु विहार डिफेन्स एन्क्लेव्ह को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी | २५-०६-२०२४ | ७.०० am ७.०० pm |
| १९ | साईमन्नत को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी | २६-०६-२०२४ | ७.०० am ७.०० pm |
| २० | महावीर हेरिटेज को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी | २६-०६-२०२४ | ७.०० am ७.०० pm |
| २१ | साई साक्षात को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी | २६-०६-२०२४ | ७.०० am ७.०० pm |
| २२ | रेल विहार को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी | २६-०६-२०२४ | ७.०० am ७.०० pm |
| २३ | पटेल हेरिटेज को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड | २६-०६-२०२४ | ७.०० am ७.०० pm |
| २४ | गुडविल पॅराडाइज को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड | २६-०६-२०२४ | ७.०० am ७.०० pm |
| २५ | केसर एक्झोटीका अपार्टमेंट | २७-०६-२०२४ | ७.०० am ७.०० pm |
| २६ | केंद्रीय विहार-१-को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग लिमिटेड | २७-०६-२०२४ | ७.०० am ७.०० pm |
| २७ | चतुर्भुज को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड | २७-०६-२०२४ | ७.०० am ७.०० pm |
| २८ | उत्सव के एच ३ को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड | २७-०६-२०२४ | ७.०० am ७.०० pm |
| २९ | शहा आर्केड को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी | २७-०६-२०२४ | ७.०० am ७.०० pm |
| ३० | हावरे टीआर को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड | २७-०६-२०२४ | ७.०० am ७.०० pm |
| ३१ | प्राईम रोझ को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड | २८-०६-२०२४ | ७.०० am ७.०० pm |
| ३२ | शाह किंग्डम अपार्टमेंट | २८-०६-२०२४ | ७.०० am ७.०० pm |
| ३३ | रोसवुड हाईट्स को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड | २८-०६-२०२४ | ७.०० am ७.०० pm |
| ३४ | मकरंद विहार को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड | २८-०६-२०२४ | ७.०० am ७.०० pm |
| ३५ | ओम हार्मोनी को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड | २८-०६-२०२४ | ७.०० am ७.०० pm |
| ३६ | कामधेनु कॉमर्झ कॉम्प्लेक्स | २८-०६-२०२४ | ७.०० am ७.०० pm |

वरीलप्रमाणे एकूण ३६ सोसायटी मध्ये मालमत्ता कराचा भरणा करण्यासाठी शिबिरांचे आयोजन करण्यात आलेले असून संबंधितांनी सदर शिबिराचा लाभ घेऊन तात्काळ कर भरणा करावा.

ज्यांना अद्यापही सुधारित मालमत्ता कर देयक प्राप्त झालेले नाही त्यांनी ऑनलाइन पोर्टल (संकेतस्थळ)/ॲप/ महानगरपालिका कार्यालयास भेट देऊन सुधारित देयक उपलब्ध करून घ्यावे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे सुधारीत देयके पुन्हा तयार करावी लागल्याने सन २०२४-२५ च्या चालू कर मागणीवर दिनांक ३१ मे अखेर देण्यात आलेली ५ टक्के इतकी सूट दिनांक ३१ जुलै २०२४ पर्यंत वाढविण्यात आलेली असून नागरिकांनी याचा लाभ घ्यावा. याशिवाय मालमत्ता कराचा भरणा ऑनलाईन केल्यास एकूण २ टक्के इतकी सुट दिली जात असल्याने नागरिकांनी त्वरित कर भरणा करून महानगरपालिकेस सहकारी करावे तसेच पनवेल शहराच्या सर्वांगीण विकासास हातभार लावावा.

दिनांक २१/०६/२०२४
स्वा/-
**(मंगेश चितळे)**
आयुक्त तथा प्रशासक
पनवेल महानगरपालिका

**जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२४/प्र.क्र. २६७/२६८/२०२४**

निवडक

## विद्यार्थी पासचे शाळेत वाटप

**श्रीवर्धन :** शालेय विद्यार्थ्यांना आपल्या गावातून शाळेत येण्यासाठी व परत आपल्या गावी जाण्यासाठी एस.टी.भाड्यात ६६ टक्के सवलत मिळते.१२ वीपर्यंत सर्व विद्यार्थिनींना प्रवासी भाड्यात पूर्ण सवलत दिली जाते.श्रीवर्धन तालुक्यातील दुर्गम भागातील सातगाव हायस्कूल, वडशेतवावे येथे आगार व्यवस्थापक मेहबूब मणेर यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी मुख्याध्यापक यांचेमार्फत मुलींचे पासेस व मुलांचे सवलतीचे पासेसचे वाटप करण्यात आले.

## सापांना दिले जीवदान

**उरण :** उरणमधील पोलीस कर्मचारी खैरावकर यांनी फ्रेंड्स ऑफ नेचरच्या हेल्पलाईनवर संपर्क करून खोपटा पुलाच्या चौकाच्या पुढे करंजा रोडलगत जाळ्यात २ साप अडकले आहेत, असे सांगितले. फ्रेंड्स ऑफ नेचरच्या सर्पमित्रांनी लवकरात लवकर या सापांची सुटका करून पिशवीत भरले. याकामी पोलीस हवालदार खैरावकर,गायकवाड, पोलीस नाईक मस्के, पोलीस नाईक मुळ व स्नेहा जोशी यांचे सहकार्य लाभले. सापाचे प्राण वाचविणाऱ्या केअर ऑफ नेचर संस्थेचे कौतुक होत आहे.

## विद्यार्थ्यांना वह्या वाटप

**उरण :** माजी आमदार मनोहर भोईर यांच्या वाढदिवसानिमित्त ग्रामपंचायत पागोटे सरपंच कुणाल अरुण पाटील व कुणाल पाटील युवा सामाजिक संस्थेच्या सौजन्याने फुंडे येथील सर्व विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आल्या. सदर कार्यक्रमास चेअरमन कृष्णा कडू, महेश पाटील, सुमित पाटील, नकुल पाटील, साईराज पाटील, ऋषिकेश म्हात्रे, विनय पाटील, प्रणय पाटील, निनाद पाटील, रोशन म्हात्रे, पंकज पाटील, मुख्याध्यापक, शिक्षक वर्ग व विद्यार्थी मोठ्या संख्येने होते.

## महिलांना मिळणार सवलत

**रायगड:** आयसीआयसीआय प्रुडेंशियल लाइफ इन्शुरन्सने त्यांच्या सर्वाधिक विक्री होणाऱ्या आय प्रोटेक्ट स्मार्ट या टर्म इन्शुरन्स प्लॅनवर केवळ महिलांसाठी भरल्या जाणाऱ्या सर्व प्रीमियम्सवर १५ टक्केची आजीवन सवलत जाहीर केली. याव्यतिरिक्त, नोकरदार महिलांना पहिल्याच प्रीमियमवर अतिरिक्त १५ टक्क्यांची सूट मिळेल. त्यांना स्वत:ला तसेच त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक सुरक्षा प्रदान करणे सोपे होईल.यात आरोग्य आणि जीवन विमा या दोन्हीचा समावेश आहे.


## वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न

**खांब :** तळवली तर्फे अष्टमी व ग्रा.पंचायत गोवे येथे वृक्षारोपण कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला. रोहा धाटाव औद्योगिक वसाहतीमधील नामांकित सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीज लिमिटेडच्या सीएसआर विभागांतर्गत वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तळवली तर्फे अष्टमी व गोवे ग्रा.पंचायत सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक अधिकारी, सदस्य आणि सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीज सीएसआर प्रमुख माधुरी सणस, महेश डेरीया, ॲड.विशाल घोरपडे उपस्थित होते.

# पाली भूतीवली धरणाचे मजबुतीकरण

**। नेरळ । प्रतिनिधी**

**कर्जत तालुक्यात रेल्वे पट्ट्यात असलेली पाणी टंचाई दूर करण्यासाठी आणि या भागातील शेती सिंचनाखाली आणण्यासाठी पाली भूतीवली येथे धरण बांधण्यात आले. २००४ मध्ये या धरणाच्या जलाशयात पाण्याचा साठा झाला असून या धरणाच्या मातीच्या बांधाला दगडी बांधकामाने अधिक मजबूतीकरण आणि रस्ताही दगडी पिचिंग करण्याचे काम पूर्ण झाले आहे. दरम्यान, या दगडी पिचिंगमुळे धरणाच्या जलाशयात पाणीसाठा वाढण्यास मदत होणार आहे.**



- **धरणाच्या भिंतीला दगडी पिचिंग**
- **पाणी साठ्यात वाढ होण्याची शक्यता**

कर्जत तालुक्यातील रेल्वे पट्ट्यात कोणतीही नदी असल्याने या भागात सतत पाणीटंचाई असायची. त्यामुळे १९८२ साली तत्कालीन आमदार स्व. तुकाराम सुर्वे यांच्या प्रयत्नातून पाली भूतीवली येथे लघुपाटबंधारे प्रकल्प मंजूर झाला. मात्र त्यानंतर या धरणाचे प्रत्यक्ष बांधकाम १९९६ मध्ये सुरु झाले. त्यावेळी तत्कालीन आमदार देवेंद्र साटम यांनी पुढाकार घेऊन खऱ्या अर्थाने कामाला सुरुवात करून घेतली होती. परिसरातील १५ गावांमधील १००० हेक्टर जमीन ओलिताखाली आणू शकणाऱ्या या लघुपाटबंधारे धरणामध्ये २००४ मध्ये प्रत्यक्ष पाणीसाठा झाला होता आणि त्यावेळी धरणातील त्या पाण्याचे जलपूजन तत्कालीन आमदार सुरेश लाड यांच्या उपस्थितीत करण्यात आले होते. मात्र धरणाच्या जलाशयात पाण्याचा साठा झाला असताना धरणाचे पाणी उजव्या आणि डाव्या कालव्यातून शेतीसाठी सोडले जावे यासाठी कळावे बांधण्यात आले नव्हते आणि त्यामुळे आजपर्यंत मागील २० वर्षात दुबार शेती १५ गावातील शेतकऱ्यांना करता आलेली नाही.

पाली भूतीवली धरणाचे पाणी शेतीसाठी मिळावे यासाठी येथे शेतकऱ्यांची संघर्ष समिती काम करीत होते. त्या संघर्ष समितीचे अध्यक्ष माजी सरपंच जवाहर देशमुख हे आज हयात नाहीत.त्यात कालव्यांची कामे गेली २० वर्षात पुढे सरकली नाहीत आणि त्यामुळे धरणाच्या पाण्यावर बिल्डर लॉबी पोसली जात आहे.त्यात शेती शिवाय तरणोपाय नाही यांची कल्पना सर्व तरुण वर्गाला अली आहे. त्यामुळे शासनाने कालव्यांची कामे पूर्ण करून शेतीसाठी या धरणाचे पाणी सोडण्यात यावे यासाठी शेतकरी आक्रमक आहेत. मागील दोन वर्षे शेतकरी या धरणाच्या अर्धवट असलेल्या कालव्यांच्या कामासाठी स्थानिक आमदार महेंद्र थोरवे यांच्याकडे अर्ज निवेदने घेऊन जात होती.

आमदार महेंद्र थोरवे यांनी देखील शासनाकडे कालव्यांची आणि धरणाची इतर कामे पूर्ण करण्यासाठी कोटींचा निधी दिला आहे. सध्या धरणाच्या सांडव्याचं भिंतीचे तसेच मुख्य बांधाचे दगडी पिचिंगचे काम पाटबंधारे विभागाने पूर्ण करण्यावर भर दिला होता. धरणाच्या मुख्य बांधावर पाण्याच्या भागात नव्याने दगडी पिचिंग करण्यात आले आहे. त्याचा परिणाम धरणाची उंची वाढण्यास झाला आहे. दुसरीकडे धरणाच्या सांडव्याचे उंची देखील वाढविण्यात आली आहे.त्यामुळे धरणातील पाणी साठा नव्याने केलेल्या दगडी पिचिंगमुळे वाढू शकणार आहे. त्याचवेळी धरणाची मुख्य विहीर आणि त्या आजूबाजूचा परिसरदेखील मजबूत करण्यात आला आहे. दुसरीकडे धरणाच्या चिंचवाडी भागात असलेल्या जमिनीतील माती बाहेर काढल्यास धरणाची पाणी साठा क्षमतादेखील वाढू शकतो. त्या भागात पूर्णपणे पाली भूतीवली धरणाची क्षमता दुप्पट होऊ शकते. आमदार किती निधी या धरणाच्या कामासाठी खेचून आणतात याकडे लक्ष लागून राहिले आहे.

## प्रशांत पाटील यांचे निधन

**। उरण । वार्ताहर ।**

उरणचे डॅशिंग नेत्रुत्व तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरदचंद्र पवार यांचे अत्यंत निकटवर्तीय समजले जाणारे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस प्रशांत पाटील उर्फ उरणकरांचे लाडके भाऊ यांचे अल्पशा आजाराने गुरुवारी (दि२०)निधन झाले आहे. प्रशांत पाटील यांच्या अचानक जाण्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केले जात आहे.



प्रशांत पाटील यांचा जन्म भेंडखळ या गावात झाला कॉलेज जीवनापासून त्यांनी तरुणांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले.शिवसेना पक्षात असताना त्यांनी तालुका प्रमुख ते जिल्हाप्रमुख ही पदे भुषवून प्रकल्पग्रस्तांच्या न्याय हक्कासाठी अनेक आंदोलने उभारली.प्रशांत पाटील यांनी राजकीय पक्षात असताना आपल्या नावाचा ठसा शासकीय अधिकारी,सर्व सामान्य माणसात उमटवला.त्यातून त्यांना आदराने सर्वसामान्य माणसाने भाऊ ही पदवी बहाल केली होती. नवी मुंबई शहराचे शिल्पकार तथा राज्याचे माजी मंत्री गणेश नाईक यांचे निकटवर्तीय समजल्या जाणाऱ्या प्रशांत पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते शरद पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा सरचिटणीस ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस म्हणून काम पाहिले.त्यांनी प्रकल्पग्रस्तांच्या न्याय हक्कासाठी आवाज उठवत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पडत्या काळात शरद पवार साहेबांची साथ सोडली नाही. असे लढवय्ये, उरणकरांचे डॅशिग नेतृत्व प्रशांत पाटील उर्फ उरणकरांचे लाडके भाऊ यांचे गुरुवारी (दि२०) हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाल्याने उरणकरांचे हक्काचे डॅशिग नेतृत्व हरपले अशी प्रतिक्रिया जनमानसात व्यक्त केली जात आहे.

# एक झाड माझ्या सत्यवानासाठी

**। पनवेल । वार्ताहर ।**

वटपौर्णिमा साजरी करण्यासाठी वडाच्या वृक्षाची तोड करून वृक्षहानी ही मोठ्या प्रमाणात होते. या गोष्टी लक्षात घेऊन पनवेल महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम जनार्दन म्हात्रे यांच्या संकल्पनेतून उलवे मधील भगिनींसाठी शेतकरी कामगार पक्ष आणि जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या वतीने वडाचे छोटे रोपटे पूजनासाठी सोसायटी आणि सोसायटीच्या परिसरांमध्ये भेट म्हणून देण्याचा उपक्रम वटपौर्णिमेनिमित्त राबवण्यात आला.



- **पनवेल शेतकरी कामगार पक्षाचा स्तुत्य उपक्रम**

भगिनींना आपल्या इमारतीच्या आवारातच सोसायट्यांमध्ये सदर रोपे देऊन पूजन करण्यासाठी आमच्याकडून एक पाऊल उचलण्यात आले आहे असे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्याकडून सांगण्यात आले. या उपक्रमात आम्ही उलवेकर महिला मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेऊन सदर रोपटे विविध ठिकाणी महिलांना भेट दिले.

## राजश्री गावंड यांचे निधन

**चिरनेर :** उरण पूर्व विभागातील आवरे येथील राजश्री गावंड यांचे रविवारी (दि.१६) अल्पशा आजाराने निधन झाले आहे. शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते संजय गजानन गावंड यांच्या त्या पत्नी होत. त्यांच्या पश्चात पती संजय गावंड, मुलगा व मुलगी असा आप्त परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी मंगळवारी (दि.२५) श्री क्षेत्र ब्राह्मणदेव आवरे येथे होणार असून उत्तर कार्य विधी शुक्रवारी (दि.२८ ) त्यांच्या राहत्या घरी आवरे येथे होणार असल्याची माहिती गावंड परिवारातर्फे देण्यात आली.



# महामार्गावर पडला भला मोठा खड्डा

**। कोलाड । वार्ताहर ।**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील आंबेवाडी नाक्यावरील मुख्य बाजारपेठेतील चौकात रस्त्याला भला मोठा खड्डा पडला असून यामुळे वाहनचालकांसह प्रवासी वर्गाच्या जीवाला धोका निर्माण झाला असून यावर उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.




मुंबई-गोवा हायवेवरील आंबेवाडी नाक्यावरील निकृष्ट दर्जाच्या कामामुळे आंबेवाडी ग्रामपंचायतीतर्फे ठेकेदारासहित तहसीलदार यांना निवेदन दिले. विविध क्षेत्रातील नागरिकांनी रास्ता रोको केला. कोलाड पोलीस ठाण्यात निवेदन दिले. कोलाड पोलिसांनी तातडीने ठेकेदाराच्या इंजिनियरला घेऊन रस्त्याची पाहणी केली यानंतर या रस्त्याचे थातुरमातुर काम केले.परंतु त्याचा काहीच उपयोग झाला नाही. हे एकंदरीत परिस्थितीवरून दिसून येत असून रोज मरे त्याला कोण रडे, अशी परिस्थिती आंबेवाडी बाजारपेठेतील झाली आहे.

मुंबई-गोवा महामार्गाच्या कामाला १६ वर्षांपूर्वी सुरुवात झाली असून सर्व कामे अतिशय संथगतीने सुरु आहेत. कोणत्याही कामाला उत्तम प्रकारचा दर्जा नाही. या मार्गावरील काम निकृष्ट दर्जाचे बनविले आहे. कारण काही ठिकाणच्या जुन्याच मोऱ्यांवर सिमेंटचा रस्ता बनविला आहे,तर बनविलेल्या रस्त्याला तडे गेले आहेत.

# कृषी संजीवनी पंधरवडा मोहिमेत शेतकरी सभा


**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यात चिरनेर गावात ग्रामपंचायतीच्या सभागृहात दिनांक २० जून रोजी, डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंती निमित्ताने कृषी संजीवनी पंधरवडा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. १७ जून ते १ जुलै या कालावधी दरम्यान कृषी संजीवनी पंधरवडा मोहिमे अंतर्गत शेतकरी सभांचे आयोजन करण्यात आले आहे. या मोहिमेत गुणवत्ता पूर्ण निविष्ठा ओळख, बियाणे, खते, कीटकनाशक याबाबत जनजागृती तसेच एक रुपयात भात पीक विमा योजना व कृषी विषयक योजनांची सविस्तर माहिती यावेळी कृषी अधिकाऱ्यांकडून देण्यात आली.

परसबाग भाजीपाला मिनी किटचे वाटपदेखील करण्यात आले. यावेळी कृषी पर्यवेक्षक एस. व्ही. लोहकरे, कृषी सहाय्यक एस. जी. घरत, कृषीमित्र प्रफुल्ल खारपाटील यांनी शेतकरी सभेत माहिती देताना सांगितले की, शेतकऱ्यांना नवीन तंत्रज्ञानाची माहिती मिळावी, तसेच शेतीपासून दूर जाणाऱ्या युवकांना शेतीकडे वळविण्यासाठी, त्यांचे गैरसमज दूर करून त्यांना शेतीचे महत्व समजावे हा प्रमुख उद्देश या कृषी संजीवनी पंधरवडा मोहिमेचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## लक्ष्मीबाई पाटील यांचे निधन

**सोगाव :** माणकुले हद्दीतील बहिरीचापाडा या गावच्या मुळ रहिवासी आणि वाघोडे ग्रामपंचायत हद्दीतील आंबेघर - तोरणपाडा येथे राहणाऱ्या लक्ष्मीबाई गोपाळ पाटील यांचे २० जून रोजी सकाळी साडेदहा वाजता राहत्या घरी निधन झाले. त्यांच्यावर आंबेघर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, नातू, पणतू, तीन मुली, जावई, तीन नाती, नात जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या अंत्यसंस्कारावेळी सर्व क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



# भावी शिक्षक नियुक्तीच्या प्रतिक्षेत

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

तीन महिने उलटून देखील राज्यशासनाच्या पवित्र पोर्टल अंतर्गत नवी मुंबई महानगर पालिकेच्या शाळेत निवड झालेले शिक्षक नियुक्तीच्या प्रतीक्षेत आहेत. या ७१ उमेदवारांचे भविष्य टांगणीला लागले आहे.

परिणामी उमेदवार व पालक चिंतेत आहेत. शिवाय उमेदवारांचा महत्वाचा वेळ वाया जात आहे. इतर जिल्ह्यातील उमेदवारांना शाळा मिळून त्यांची नियुक्ती देखील झाली आहे, मात्र नवी मुंबईतील उमेदवार मात्र नियुक्ती वाट पाहत आहेत. पात्र उमेदवार मंगळवारी (दि. १८) आयुक्त कार्यालयात गेले होते. मात्र तिथे त्यांची निराशा झाली.

अमृत महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने ७५००० नोकर भरती करण्याच्या अनुषंगाने शिक्षण विभागातील शिक्षकपदे भरण्यासाठी अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी परीक्षा २०२२ अंतर्गत संपूर्ण महाराष्ट्रभर शिक्षक भरती सुरु केली. त्याद्वारे शासनाने २५ फेब्रुवारी रोजी निवड यादी जाहीर केली.

पुणे आयुक्त कार्यालयाकडून महाराष्ट्र शिक्षण आयुक्त सुरज मांढरे यांनी लोकसभा निवडणुकीच्या आदर्श आचारसंहितेपूर्वी नवनियुक्त शिक्षकांना नियुक्तीपत्र देण्यासंदर्भात त्या-त्या आस्थापनेला कार्यवाही करण्यासाठी सूचित केले गेले होते. मात्र नवी मुंबई महानगर पालिका शिक्षण विभागाने निवड यादी प्रसिद्ध झाल्याच्या १५ दिवसांनी म्हणजेच ११ व १२ मार्च २०२४ रोजी उमेदवारांची कागदपत्र पडताळणी पूर्ण केली.

मुळात कागदपत्र पडताळणीला पालिकेकडून विलंब झाल्याने १६ मार्च २०२४ पासून लोकसभेची आदर्श आचारसंहिता लागली असता पुढील सर्व प्रक्रिया ठप्प झाली. त्या दरम्यान १९ एप्रिल २०२४ रोजी आयुक्त कार्यालय पुणे यांच्याकडून ज्या ठिकाणी प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया पार पडली त्या आस्थापनेला शिक्षक भरती प्रक्रिया सुरु करण्यासंदर्भातील निवडणूक आयोगाने दिलेल्या परवानगीचे पत्र जारी केले. मात्र नवी मुंबई महानगर पालिका क्षेत्रात २० मे रोजी निवडणूक प्रक्रिया पार पडू देखील शिक्षक भरतीबाबतची कोणतीही कार्यवाही केली गेली नाही.

> **शिक्षक नियुक्तीसाठी आवश्यक सर्व प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. सध्या कोकण पदवीधर निवडणुकीची आचारसंहिता चालू असल्यामुळे नियुक्ती प्रक्रिया राबवता येत नाही. आचारसंहितेमुळे राज्यातील इतर काही ठिकाणची प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. केंद्र व राज्य शासनाच्या नियमांच्या अधिन राहून काम करावे लागते. आचारसंहिता संपल्यावर नियुक्ती प्रक्रिया राबवण्यात येईल. उमेदवारांना या संदर्भात काही माहिती हवी असल्यास त्यांनी मला प्रत्यक्ष येऊन भेटावे व त्यांचे प्रश्न मांडावे. तसेच उमेदवारांना आचारसंहिते संदर्भात माहिती आहे.**
> **डॉ. कैलास शिंदे, आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका**

## हरिश्चंद्र पाटील यांचे निधन

**शिहू :** शिहू गावचे सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक हरिश्चंद्र धाया पाटील यांचे १४ जून रोजी वयाच्या ६४ व्या वर्षी दीर्घ आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पच्छात पत्नी, दोन मुलगे, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे. पैकी मुलगा अथर्व पाटील व मुलगी साक्षी किरण पाटील हे रायगड पोलीस दलात कार्यरत आहेत. त्यांचा दशक्रिया विधी दि. २३ जून रोजी पाली उद्धर येथे तर उत्तरकार्य २६ जून रोजी शिहू येथील राहत्या घरी होणार आहे.



# झुगरेवाडी शाळेत पर्यावरणपूरक प्रवेशोत्सव

*। नेरळ । प्रतिनिधी ।*

***रायगड जिल्ह्यातील उपक्रमशील समजल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद आदर्श शाळा म्हणून झुगरेवाडी शाळा समजली जाते.या झुगरेवाडी शाळेत पर्यावरण पूरक प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला.***



- **पालकांनी दिली झाडे भेट**
- **विद्यार्थ्यांनी पालकांसह लावली झाडे**

*दिवसेंदिवस तापमानात प्रचंड वाढ होत आहे,कर्जत मधील तापमान कधी नव्हे ते चाळीशी पार झाले आहे.या गोष्टींचा विचार करून रायगड जिल्हा परिषदेच्या झुगरे वाडी शाळेत पर्यावरण संवर्धन करणेसाठी ऑक्सिजन आणि सावली देणारी वडाच्या २० झाडांची लागवड पालक आणि विद्यार्थी यांच्या हस्ते करण्यात आली. त्याचवेळी शाळेत कार्यरत असणाऱ्या पर्यावरण क्लबच्या माध्यमातून या झाडाच्या संवर्धनासाठी लक्ष दिले जाणार आहे. लहान वयात विद्यार्थ्यांना पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन करणे सोपे जावे असा उद्देश पर्यावरण क्लबचा आहे.*

*शाळेत पहिले पाऊल ठेवत असताना विद्यार्थ्यांना पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन यांची जाणीव व्हावी यासाठी त्यांच्या हस्ते तसेच त्यांच्या पालकांच्या हस्ते झाडे लावण्यात आली. यावर्षी इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश घेवून दाखल झालेल्या २० विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांच्या हस्ते २० वड संवर्गातील झाडांची लागवड करण्यात आली. त्याचवेळी लावण्यात आलेल्या झाडांची जोपासना करण्यासाठी प्रतिज्ञा सर्व विद्यार्थी आणि पालक यांना देण्यात आली. ही रोपे पालकांनी आपल्या घराच्या अंगणात,आवारात आणि शेताच्या बांधावर लावून त्यांची जोपासना केली जाणार आहे.*

# वड वृक्षारोपणातून वटपौर्णिमा

**■ नागाव पंचायतीचा आगळा वेगळा उपक्रम**

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

वाढत्या प्रदुषण व तापमानावर मात करण्यासाठी वड वृक्षारोपणातून वटपौर्णिमा साजरी करण्यात आली. नागाव ग्रामपंचायतीमार्फत हा आगळा वेगळा उपक्रम सरपंच हर्षदा मयेकर यांच्या संकल्पनेतून गुरुवारी (दि.२०) राबवण्यात आला. या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

वणवा व अनेक कारणांमुळे झाडे नष्ट होऊ लागली आहेत. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडण्याचा धोका वाढला आहे. उष्णता वाढत आहे. मानवी आरोग्यावर त्याचा परिणाम होत आहे. ही बाब लक्षात घेऊन वटपोर्णिमेचे औचित्य साधत नागाव ग्रामपंचायत मार्फत वड वृक्षारोपण कार्यक्रम गुरुवारी नागाव परिसरात राबवण्यात आला. नागाव पाल्हे या परिसरात ३० हून अधिक रोपांची लागवड करण्यात आली. त्या रोपांचे संगोपन करण्याचाही संकल्प करण्यात आला . यावेळी पदाधिकारी, सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते .



# परिक्षांचा बट्ट्याबोळ

पावसाने झोडपले, राजाने मारले तर दाद कोणाकडे मागणार अशी जुनी म्हण आहे. त्यात आता उच्च शिक्षणासाठी परीक्षा घेणाऱ्या संस्थांनी ठकवले तर, असाही शब्दप्रयोग जोडायला हवा. नॅशनल टेस्टिंग एजन्सी नावाच्या यंत्रणेने जो काही बट्ट्याबोळ केला आहे तो अभूतपूर्व आहे. जगातील तिसरी अर्थव्यवस्था म्हणून मिरवणाऱ्या नरेंद्र मोदींच्या देशातील शिक्षण व्यवस्थेचे लाजिरवाणे चित्र सर्व जगासमोर आले आहे. आधी वैद्यकीय शिक्षणाची पूर्वपरीक्षा असलेल्या नीटमधील घोटाळा समोर आले. आता महाविद्यालयात प्राध्यापक किंवा पीएचडी करण्यासाठी द्याव्या लागणारी यूजीसी-नेट ही परीक्षा रदद् करण्यात आली आहे. नीटसाठी २३ लाख तर नेटसाठी नऊ लाख विद्यार्थी बसले होते. म्हणजे देशभरातील सुमारे ३२ ते ३५ लाख कुटुंबांचा जीव टांगणीलालावणारा हा सर्व प्रकार आहे. नीटची परीक्षा रदद् झालेली नाही. मात्र तशी मागणी करणाऱ्यायाचिका सर्वोच्च न्यायालयापुढेप्रलंबित आहेत. न्यायालयाने आदेश दिल्यास ही परीक्षा पुन्हा घ्यावी लागेल. नीटच नव्हे तर कोणतीही परीक्षा पुन्हा द्यावी लागण्याचा ताण किती प्रचंड असतो हे विद्यार्थ्यांनाच कळू शकते. त्यातही ज्या एका परिक्षेवर भवितव्य अवलंबून आहे ती परीक्षा पुन्हा द्यावी लागणे यासारखे जीवघेणे दुसरे काही नसेल. डॉक्टर होणे हे अनेकांचे स्वप्न असते. ही परीक्षा पास होणे हे डॉक्टरकीच्या अभ्यासापेक्षाही कठीण असते असे म्हटले जाते. ज्या विद्यार्थ्यांना सध्याच्या गुणवत्ता यादीनुसार वैद्यकीय अभ्यासक्रमाला प्रवेश मिळणार आहे त्यांना पुन्हा परिक्षेला बसवणे म्हणजे अनिश्चिततेच्या अंधारात ढकलणे आहे. नव्या परिक्षेनंतरच्या गुणवत्ता यादीत आपला नंबर लागला नाही तर काय करायचेअशी टांगती तलवार त्यांच्यावर व त्यांच्या कुटुंबियांवर राहणार आहे. या सर्व यातना त्या असंख्य निरपराध मुलांनी व कुटुंबांनी का सोसाव्यात या प्रश्नाला एकच उत्तर आहे - ते म्हणजे ते भारतात राहतात आणि नॅशनल टेस्टिंग एजन्सी (नॅट)सारख्या अकार्यक्षम यंत्रणेमार्फत घेतली जाणारी परीक्षा देण्यावाचून त्यांना गत्यंतर नाही.

### गुजरातेतील भानगड

पूर्वी काँग्रेसच्या काळात अशा यंत्रणांवर आरोप झाले तर सरकार थोडेतरी हलत असे. मंत्र्यांना जबाबदारी घ्यावी लागत असे. नरेंद्र मोदींचे भाजप सरकार इतके निगरगट्ट आहे की, या यंत्रणांमधील अधिकाऱ्यांना पूर्णपणे अभय दिले जाते. मध्य प्रदेशात सर्व प्रकारच्या परीक्षा घेण्यासाठी व्यावसायिक परीक्षा मंडळ अर्थात व्यापम नावाची यंत्रणा निर्माण करण्यात आली. त्यात प्रचंड भ्रष्टाचार झाल्याचे उघड झाले. पण एकही राजकीय नेता वा अधिकारी यांना शिक्षा झाली नाही. नीटच्यापरिक्षेतील अनेक भानगडी उघड होऊनही मोदी सरकारातील मंत्री धर्मेंद्र प्रधान हे मात्रनॅटचीपाठराखण करीत आहेत. नीट परीक्षा पाच मे रोजी झाली. तिचे पेपर फुटल्याच्या तक्रारी पहिल्या दिवसापासून सुरू आहेत. बिहार पोलिसांनी या प्रकरणी काही जणांना अटकही केली. त्यातच गुजरातमध्येहीगोध्रा येथील एक रॅकेट उघडकीस आले. पूर्वी दहावी वा बारावीमध्ये सहज कॉपी करता येते अशा शाळांची काही सेंटर्स कुख्यात असत. लांबलांबचे विद्यार्थी ते सेंटर मिळावे यासाठी लाच देत असत. नीटच्यापरिक्षेत असेच काहीसे घडले. गोध्रा येथील एक सेंटर इतके लोकप्रिय आहे की तेथे बंगाल, बिहारसारख्या लांबलांबच्या ठिकाणच्या विद्यार्थ्यांनी याच सेंटरची निवड केल्याचे आढळले. प्रत्यक्ष परिक्षार्थीखेरीजभलत्यालाच परीक्षा लिहू देण्याची परवानगी देणे, पेपर फोडणे असेही प्रकार ि तथे झाल्याचा संशय आहे. त्याची चौकशी चालू आहे.याचे धागेदोरे किती पसरले आहेत याचा अंदाज अजून आलेला नाही. मात्र यंदा तब्बल ६७ विद्यार्थ्यांना ७२० पैकी ७२० गुण मिळाले. एरवी दोन-चार जणांनाच ते मिळतात. शिवाय, यंदाची गुणवत्ता यादी प्रचंड फुगली आहे. गेल्या वेळी समजा सातशे गुण मिळालेले शंभर लोक असतील तर ते यंदा दोन हजार झाले आहेत.

### मोदी, इकडे लक्ष द्या

यंदा काही सेंटरवर परीक्षा उशिरा सुरू झाली व त्यामुळे आपला वेळ वाया गेला अशी तक्रार काही विद्यार्थ्यांनी केली होती. ती मान्य करून सुमारे दीड हजार विद्यार्थ्यांना ग्रेस मार्क्स किंवा वाढीव गुण देण्याचा निर्णय झाला. पण त्यातही घोळ घालण्यात आला. जेवढा वेळ वाया गेला तितक्याच प्रमाणात हे वाढीव गुण दिले जाणे अपेक्षित होते. प्रत्यक्षात ते अधिक दिले गेले. त्यामुळे काही जणांना ७१८, ७१९ असे गुण मिळून ते गुणवत्ता यादीत वर गेले. याला न्यायालयात जेव्हा आव्हान दिले गेले तेव्हा हे गुण रद्द करण्यात आले व या विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा घेण्याचे आदेश देण्यात आले. एकूण या सर्व प्रकरणात बरेच पाणी मुरलेले असावे असे वाटण्याजोगी स्थिती आहे. त्यातच आता याच नॅटद्वारे १८ जूनला घेतलेली यूजीसी-नेट ही परीक्षा रद्द करण्यात आली आहे. अमित शाह यांच्या गृह खात्याच्या सल्ल्यावरून धर्मेंद्र प्रधान यांच्या शिक्षण मंत्रालयाने हा निर्णय घेतला. मात्र, नीटच्यापरिक्षेत इतक्या भानगडी होऊनही त्याची कबुली देण्यास हेच प्रधान वा शाह तयार नाहीत. सर्व देशासाठी एकच एक नीटची परीक्षा घेणे ही खास मोदी सरकारची कल्पना आहे. तिचे काही फायदे असले तरी निःपक्ष व कार्यक्षम रीतीने अशी परीक्षा घेण्यात हे सरकार पूर्णतः अपयशी ठरले आहे. यंदा या सर्व गोंधळाचा स्फोट झाला इतकेच.खुद्दनॅटच्या वतीने करण्यात आलेल्या पाहणीनुसार, यंदा असंख्य परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही नव्हता, इतर अनेक केंद्रांवर विद्यार्थ्यांच्या तपासणीसाठी पुरेसा व प्रशिक्षित शिक्षकवर्ग नव्हता, पेपर सुरक्षित ठेवण्यासाठीची व्यवस्थाही अत्यंत ढिसाळ होती. यूजीसी-नेटची परीक्षा संगणकावर न घेता कागद-पेन वापरून लेखी घेण्यात आली. त्यातून वेगळे गैरप्रकार झाले. मोदींनी आता इकडेतिकडे फोटो काढत मिरवण्यापेक्षा याकडे लक्ष द्यावे. अन्यथा या देशातील शिक्षण व्यवस्थेवरचा विद्यार्थी व शिक्षकांचा उरलासुरला विश्वास ढासळून जाईल.

---

विचार

# अतिउष्णता कामगारांच्या जीवावर

*भारतासारख्या देशात ९० टक्के कामगार शक्ती कृषी, बांधकाम, वीटभट्टी आणि इतर तत्सम क्षेत्रांमध्ये प्रचंड राबते. तेथे काम करणाऱ्या कामगारांना उष्णतेच्या तीव्रतेमुळे लक्षणीय धोका सहन करावा लागतो. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या नवीन अहवालात जगभरातील ७० टक्क्यांहून अधिक कामगारांना अतिउष्णतेचा धोका वर्तवण्यात आला असून त्यांची सुरक्षा आणि आरोग्यासाठी गंभीर धोका निर्माण झाला आहे.*



**मिलिंद बेंडाळे**

जगातील ३.४ अब्ज कर्मचाऱ्यांपैकी २.४ अब्जाहून अधिक कामगारांना त्यांच्या कामाच्या वेळी कधी तरी अतिउष्णतेचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या 'बदलत्या हवामानात कामाच्या ठिकाणी सुरक्षितता आणि आरोग्य सुनिश्चित करणे' या शीर्षकाच्या अहवालानुसार, २००० ते २०२० या २० वर्षांच्या कालावधीमध्ये उष्णतेमुळे जोखीम अंदाजांमध्ये ३४.७ टक्के वाढ झाली आहे. हवामानबदलामुळे जागतिक तापमानात वाढ होत आहे, हे त्रिकालाबाधित सत्य आहे. याव्यतिरिक्त, जादा तापमानामुळे जागतिक कर्मचारीवर्ग अकाली वृद्ध होत आहे. मोठ्या संख्येने लोक संभाव्य धोकादायक उष्णतेच्या स्थितीत आहेत. गेल्या २० वर्षांमध्ये अतिउष्णतेमुळे धोकादायक स्थितीत गेलेल्या कामगारांचे प्रमाण ६५.५ टक्क्यांवरून ७०.९ टक्क्यांपर्यंत वाढले आहे. २०२३ मध्ये तापमानात विक्रमी वाढ झाली आहे. २०२४ मध्येही हा ट्रेंड कायम राहिला. जागतिक हवामान संघटनेच्या मते जानेवारी २०२४ हा आतापर्यंतचा सर्वात उष्ण जानेवारी महिना होता. भारतात ९० टक्के श्रमशक्ती अनौपचारिक क्षेत्रात कार्यरत आहे. शेती, बांधकाम, वीटभट्ट्या आणि इतर तत्सम क्षेत्रांमध्ये काम करत असताना कामाच्या वेळी जास्त उष्णतेच्या संपर्कात आल्याने कामगारांना उष्माघाताचा त्रास होतो. हवेचे तापमान, आर्द्रता आणि औद्योगिक सेटिंगमधून उष्णतेचे स्रोत, उष्णता उत्सर्जित करणारे स्रोत आणि यंत्रसामग्रीमुळेही भोवतीच्या तापमानात वाढ होत असते. भारतीयांना आधीच कळत नकळत मानवी जगण्याच्या मर्यादेच्या आसपासच्या तापमानाचा सामना करावा लागत आहे.

उष्णतेशी संबंधित जोखमींमुळे सर्वाधिक प्रभावित होणाऱ्या घटकांमध्ये दारिद्र्य, अनौपचारिक रोजगार आणि शेतीचे जास्त दर पाहता येतात. वंचित आणि असुरक्षित लोकसंख्येला याचा जास्त धोका आहे. शेती किंवा किनारपट्टीवर काम करणाऱ्यांना उष्णतेचा धोका आहे. भारत, आफ्रिकन आणि पश्चिम आशियाई देशांसारख्या उष्ण तसेच ग्रामीण भागात मूत्रपिंडाच्या तीव्र आजाराची महामारी मोठ्या प्रमाणात शारीरिक श्रम करणाऱ्या कामगारांना प्रभावित करत आहे. अहवालात म्हटले आहे, की मूत्रपिंड निकामी झाल्यामुळे कृषी कामगार मोठ्या संख्येने मृत्यू पावू लागले आहेत. एकट्या मध्य अमेरिकेत, एका दशकात २० हजारांहून अधिक लोक या आजाराने मरण पावले असल्याची शक्यता वर्तवली गेली आहे. दरम्यान, जगभरात २६.२ दशलक्ष लोक कामाच्या ठिकाणी उष्णतेच्या तणावाशी संबंधित तीव्र मूत्रपिंडाच्या आजाराने ग्रस्त होते.

जागतिक कामगार संघटनेने आणखी एका अभ्यास अहवालाचा हवाला देऊन म्हटले आहे की सामान्य कार्य चालू ठेवण्यासाठी शरीराचे तापमान ३७ अंश सेल्सिअस राखणे आवश्यक आहे. ते ३८ अंश सेल्सिअसपेक्षा अधिक वाढल्यास शारीरिक आणि संज्ञानात्मक कार्ये विस्कळीत होतात. ते ४०.६ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त वाढल्यास अवयवांचे नुकसान होऊन संवेदना नष्ट होण्याचा धोका निर्माण होऊन मृत्यू होऊ शकतो. अति उष्णतेमुळे दरवर्षी होणाऱ्या २२.८७ दशलक्ष व्यावसायिक अपघातांमध्ये अंदाजे १८,९७० जीव जातात तर २.०९ दशलक्ष लोकांना अपंगत्व येते. भारतातील बहुतेक उष्णतेवरच्या कृती योजना स्थानिक संदर्भांशी जुळवून घेत नाहीत. अभ्यास अहवालात नमूद केले आहे की कामगारांमधील आरोग्याच्या अनेक परिस्थितीचा संबंध हवामानबदलाशी आहे. त्यात कर्करोग, हृदयविकार, श्वसन रोग, मूत्रपिंड निकामी होणे आणि मानसिक आरोग्य आदींचा सामवेश आहे. १.६ अब्ज कामगार अल्ट्राव्हायोलेट किरणोत्सर्गाच्या संपर्कात आहेत आणि १८,९६० पेक्षा जास्त कामगार दर वर्षी नॉन-मेलेनोमा त्वचेच्या कर्करोगामुळे बळी पडतात. १.६ अब्ज लोक कामाच्या ठिकाणी वायू प्रदूषणाच्या संपर्कात येतात. दर वर्षी आठ लाख ६० हजार कामगारांचा मृत्यू होतो. कृषीक्षेत्रातील ८७० दशलक्षपेक्षा अधिक कामगार कीटकनाशकांच्या संपर्कात येण्याची शक्यता असते. कीटकनाशकांच्या विषबाधेमुळे दर वर्षी तीन लाखांहून अधिक मृत्यू होतात. परजीवी आणि वेक्टर-जनित रोगांमुळे दर वर्षी १५ हजार मृत्यू होतात. बांगलादेशमध्ये, विविध कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या चार लाखांहून कामगारांना प्रचंड उष्णतेमुळे वेगवेगळ्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. यातील ६० टक्के कर्मचारी महिला आहेत. संयुक्त राष्ट्राच्या अहवालानुसार, कारखान्यांमध्ये विशेषतः कापड कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या दोन तृतीयांशपेक्षा जास्त कामगारांना यंदाच्या उन्हाळ्यात प्रचंड उष्णतेचा सामना करावा लागला. २२ वर्षीय आयशा तालुकदार तनिसा ही ढाका येथील एका जीन्स कारखान्यात टेलर म्हणून काम करते. हा कारखाना पाश्चिमात्य ब्रँडसाठी कपडे बनवतो. बांगलादेशच्या ७० वर्षांच्या इतिहासात इतक्या तीव्रतेची आणि कालावधीची उष्णतेची लाट आली नव्हती. ती म्हणते, 'आमच्यापैकी काही मुली आजारी पडल्या आहेत. उष्णतेमुळे त्यांना मळमळ किंवा अशक्तपणा जाणवतो. कापड कारखान्यांमध्ये काम करणाऱ्यांसाठी उष्मा एक आव्हान बनले आहे.' एका संशोधन अहवालानुसार, अत्यंत उष्णतेच्या प्रभावामुळे बांगलादेश वार्षिक सहा अब्ज डॉलरची श्रम उत्पादकता गमावत आहे. संयुक्त राष्ट्रांच्या अहवालात म्हटले आहे की जगभरातील दोन तृतीयांशपेक्षा जास्त कामगार कामाच्या ठिकाणी तीव्र उष्णतेच्या संपर्कात आले आहेत.

'बांगलादेश इंस्टिट्यूट ऑफ लेबर स्टडीज'चे उपसंचालक मनिरुल इस्लाम म्हणतात, 'उष्णता हा कापड उद्योगासाठी एक गंभीर व्यावसायिक धोका आहे.' इस्लामने चारशेहून अधिक कामगारांचे सर्वेक्षण केले आणि सांगितले की पाचपैकी एका कामगाराला उष्णतेमुळे किमान एकदा आजारी रजेवर जावे लागले. ३२ टक्के कामगारांनी सांगितले की अतिउष्णतेमुळे त्यांची कामाची क्षमता कमी झाली आहे. काही प्रमुख कपडे उत्पादक आपल्या कामगारांचे उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी पावले उचलत आहेत; परंतु कामगार अधिकार कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे की कामगारांच्या आरोग्याचे रक्षण करण्यासाठी आणि त्यांची उत्पादकता वाढवण्यासाठी पुरवठादार, ब्रँड आणि सरकारकडून अधिक पैसे आणि वचनबद्धता आवश्यक आहे. केवळ कारखाने थंड ठेवल्याने कामगारांचे संरक्षण होत नाही. बांगलादेशसारख्या देशात, कामगारांना कामाच्या ठिकाणी पोहोचण्यासाठी तीव्र उष्णतेमध्ये लांबचा प्रवास करावा लागतो. सार्वजनिक वाहतुकीचे पर्याय मर्यादित असणाऱ्या या देशामध्ये बरेच लोक लहान आणि अरुंद घरांमध्ये राहतात. बांगलादेशमधील वस्त्रोद्योगात काम करणारे कामगार महिन्याला सरासरी ११३ डॉलर (सुमारे ९४०० रुपये) कमावतात. एवढ्या मर्यादित उत्पन्नामुळे महागड्या वातानुकूलित यंत्रणा आणि जनरेटर या कामगारांच्या आवाक्याबाहेर आहेत.

उन्हाळ्यात वीज खंडित होणे, ही बांगलादेशची आणखी एक समस्या आहे. 'ग्लोबल वर्कर डायलॉग' (जीडबल्यूडी)चे कार्यकारी संचालक गाय स्टुअर्ट नियमितपणे कारखाना कामगारांच्या परिस्थितीचे सर्वेक्षण करतात. त्यांचे म्हणणे आहे की कारखाने थंड ठेवणे एक वेळ शक्य आहे; परंतु कामगारांना प्रवासादरम्यान किंवा गर्दीच्या घरात राहताना वेगळ्या समस्यांना तोंड द्यावे लागते. 'ग्रीट टेक्नॉलॉजी लि.' या ऊर्जा तंत्रज्ञान कंपनीमधील ऑपरेशन्सचे प्रमुख सुदीप पॉल यांनी अनेक वर्षे कारखान्यांना हवामानातील आव्हानांचा सामना करण्यास मदत केली आहे. ते म्हणाले की साधी, स्वस्त पावले बदल घडवून आणू शकतात. यामध्ये सकाळी आठऐवजी सकाळी सहा वाजता शिफ्ट सुरू करणे समाविष्ट असू शकते. त्यामुळे कामगार दुपारच्या तीव्र उष्णतेपूर्वी दुपारच्या जेवणासाठी जाऊ शकतात. त्यांना घरी परतण्यासाठी हलके सुती कपडे आणि पांढरे छत्र प्रदान केले जाऊ शकते. कारखान्यांमध्ये कूलरही बसवता येतील; जेणेकरून उष्णता कमी करता येईल. संयुक्त राष्ट्राच्या आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या अहवालानुसार कामाच्या ठिकाणी झालेल्या दुखापतींमुळे दर वर्षी सुमारे १९ हजार लोकांचा मृत्यू होतो आणि अंदाजे २६.२ दशलक्ष लोक कामाच्या ठिकाणी होणाऱ्या उष्णतेच्या त्रासामुळे मूत्रपिंडाच्या आजाराने ग्रस्त आहेत. अतिउष्ण हवामानाच्या परिणामापासून वाचवण्यासाठी तज्ज्ञांनी सुचवलेल्या उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

---

आजकाल

# आर्थिक बहिष्कार - एक फोल आवाहन

**संजीव चांदोरकर**

जून ४ च्या निवडणूक निकालांच्या प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत ; त्यातीलच एक वाचनात आली ती म्हणजे मुस्लिम नागरिकांच्या धंदा/ व्यवसायांवर बहिष्कार घालण्याचे आवाहन भारत देशाच्या सेक्युलर फॅब्रिकला फाडण्याचा हा प्रयत्न आहे. त्याचा मानवतावादी / सामाजिक / मूल्यात्मक/ घटनात्मक निकषांवर विरोध करावयास हवाच. पण या छोट्या पोस्टमध्ये आपण अशा प्रकारच्या कार्यक्रमाना फक्त आर्थिक तर्क/ इकॉनॉमिक रॅशनॅलिटी लावून तपासून पाहणार आहोत याचा अर्थ असा कि आपले हे म्हणणे फक्त हिंदू वि मुस्लिम आवाहन प्रति आवाहनाला लागू नसणार आहे.

उद्या इतर कोणी ''क्ष'' समूहाने ''य'' समूहाच्या धंदा/ व्यवसायांवर बहिष्कार घालण्याचे आवाहन केले तरी देखील खालील मुद्दे लागू पडतील ; उदा तामिळ राज्यात मराठी मालावर बहिष्काराचे आवाहन

१. हे शस्त्र नेहमीच बहुसंख्यांक आपली ज्या भूभागात वट चालते त्या भूभागातील आपल्या अल्पसंख्यांक शत्रू विरुद्ध वापरतो; बहू किंवा अल्पसंख्याक जातीय / धार्मिक/ भाषिक कोणत्याही प्रकारचे असू शकतात

२. बहिष्कारवाल्या या अडाणी लोकांना हे कळत नाही कि देशात नक्कीच असे भूभाग आहेत जेथे अल्पसंख्याक बहुसंख्य असू शकतात ; आणि एका ठिकाणची चेन प्रतिक्रिया भविष्यात दुसरीकडे उमटू शकते ; यांना हे कळत नाही कि याचे आंतरराष्ट्रीय स्थरावर देखील पडसाद उमटू शकतात आणि बहिष्काराचे शस्त्र भारतावर आज ना उद्या उलटू शकते

३. खरतर आधुनिक औद्योगिक / भांडवली प्रणालीतील आर्थिक व्यवहार प्रचंड गुंतागुंतीचे आहेत. उपभोग्य वस्तुमाल / सेवांच्या उत्पादन प्रक्रियेत अक्षरशः अगणित पायऱ्या असतात. त्यात भांडवल , कच्चा माल , ऊर्जा , श्रम, सेवा कोठून कोठून पुरवले जाते ते सुटे काढता येतच नाही./ त्याचा मागोवा घेणे अशक्य असते.

त्यात कोणत्या जातीच्या/ धर्माच्या/वंशाच्या/ कातडीच्या माणसांनी काय आणि किती योगदान दिले हे कळणार नाही ( ग्राहकांचा आयाम तर अजून व्यामिश्र आहे , विस्तारभयास्तव नाही बोलत). याच्या असंख्य पेडी एकमेकात एवढ्या बेमालूम पणे मिसळल्या आहेत कि एक पेड कापून काढली तर आपल्या पेडीला देखील प्राणांतिक इजा होणारच असते

४. मग या ज्या आर्थिक बहिष्काराच्या धमक्या दिल्या जातात त्या प्रत्यक्षात येऊच शकणार नसतात का ? तर तसे नाही ; बहिषकराचे शस्त्र चालू शकणाऱ्या साऱ्या अर्थव्यवस्था / आर्थिक व्यवहार औद्योगिक भांडवशाही पूर्व अवस्थेतील, लोकलाईज्ड आहेत, त्यात फारशा मूल्यवृद्धी होत नसतात, त्यात श्रम विभागणी फारसा वाव नसतो , भांडवल अगदी थोडे आणि स्थानिक पातळीवर मोबिलाइज्ड केलेले असते, उदा स्थानिक वस्तुमालाचा व्यापार किंवा अतिशय प्राथमिक अवस्थेतील उत्पादन किंवा सूक्ष्म/ लघुउद्योग इत्यादी

५. जे आर्थिक व्यवहार / उत्पादन प्रक्रियांमध्ये उच्च दर्जांपासून कमी दर्जाची कौशल्ये एकाचवेळी लागतात, अतिशय सूक्ष्म श्रम विभागणी असते, चहुबाजूने गोळा केलेले भांडवल ओतले जाते, मार्केटची फूटप्रिंट व्यापक आहे , तेथे आर्थिक बहिष्काराची भाषा कोणी करत नाही , केली तर वाळूत पाणी ओतल्या ओतल्या विरून जाते

६. आंतरराष्ट्रीय व्यापारात चीनने भारताच्या सीमेवर धुमाकूळ घालून देखील भारतातील चीनची भांडवली गुंतवणूक, आयात निर्यात कोणीही थांबवू शकलेला नाही , कारण त्या बहिष्कामुळे भारतीय अर्थव्यवस्थेचेच अधिक नुकसान होऊ शकते ; तीच गोष्ट अमेरिका चीन ताणतणावाची

७. आर्थिक बहिष्काराची भाषा हि अँटी मार्केट तत्वज्ञान आहे; हे मार्केट तत्वज्ञान लहान थोरांना गेली ४० वर्षे पाजणाऱ्या सुटेड बुटेड अर्थतज्ञाना माहित आहे. जीवनाच्या प्रत्येक आयामाला मार्केट शक्ती कशा बरोबर आहे हे सांगणाऱ्या पैकी एक जण (एक जण !) या आर्थिक बहिष्काराबद्दल जाहीर भूमिका घेत नाही ; कारण आणि या वर्गाचा अनेक तोंडीपणा सर्वांना माहित आहे. ८ शेवटचा मुद्दा : जान माल सुरक्षित राहणे हि मानवी जीवनाची पूर्वअट आहे ; एकदा दोनदा लोक शोषून घेतील, एखाद दुसऱ्या ठिकाणी झाले तर गप्प बसतील.

पण यात एक पॅटर्न आहे , आणि हे ठरवून केले जात आहे, प्रचलित कायदे / राजकीय नेतृत्व आपल्याला सुरक्षितता देत नाहीयेत असा मेसेज तयार झाला कि लोक स्थलांतर करून आपले लोक ज्या ठिकाणी बहुसंख्य आहेत अशा ठिकाणी स्थलांतरित होतील, आपापल्या लोकांच्या जवळपास कायमच्या वस्त्या करतील , संपूर्ण देशात जात/धर्म/भाषा निहाय असे भौगोलिक पॉलरायझेशन होणे देशाच्या भविष्यासाठी चांगले नाही आणि आर्थिक बहिषकराबद्दल कृती करण्यास नकार देणाऱ्या राजकीय नेतृत्वाबद्दल न बोललेले बरे

---

लोकसंसद

## सण-उत्सवांवर विनोद करू नका!

नुकताच वटपौर्णिमेचा सण पार पाडला. वटपौर्णिमा खरे तर एक व्रत असून या व्रतामागे ऐतिहासिक आणि शास्त्रीय कारण आहे. पातिव्रत्याचे महत्व अधोरेखित करणारे हे व्रत हिंदू धर्माचे आणि भारतीय संस्कृतीचे आगळे महत्वही विशद करते. हल्लीच्या पिढीवर असलेला पाश्चिमात्य विकृतीचा प्रभाव आणि हिंदू धर्माविषयी असलेले घोर अज्ञान यांमुळे सोशल मीडियावर या दिवशी व्रताचे महत्व सांगणाऱ्या पोस्टहून अधिक या व्रताची टिंगल टवाळी करणाऱ्या पोस्ट आणि मिम्स पाहायला मिळाल्या. दुर्दैव म्हणजे या पोस्ट आणि मिम्स तयार आणि ते चवीने फॉरवर्ड करणारे, त्यावर तितक्याच विनोदी प्रतिक्रिया देणारे हिंदूच होते. अन्य पंथीयांच्या बाबतीत असा भाग कधीच पाहायला मिळत नाही. अन्य पंथीयांच्या श्रद्धास्थानांची कोणी निंदा मस्करी करण्याचा प्रयत्न केला तर त्याचे पडसाद जगभर उमटतात. हिंदू धर्मातील सण उत्सवांची टिंगल टवाळी करण्यात मात्र हिंदूच अग्रेसर असतात. मनोरंजन वाहिन्यांवरील विनोदी कार्यक्रमांतून, सिनेमा-नाटकांतून सण-उत्सवांवर विनोद केले जातात किंवा त्यांविषयी गैरसमज निर्माण होतील असे संवाद त्यांतील पात्रांच्या तोंडी दिले जातात. वटपौर्णिमेपासून एकेक सण-उत्सवाला सुरुवात होते. तसे हे टुकार विनोद आणि मिम्स तयार करणारेही तितकेच कार्यरत होऊ लागतात.

**- सौ. मोक्षदा घाणेकर,** काळाचौकी

---

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२२ जून**

**१८५६:-** संस्कृत व मराठी भाषा आणि व्याकरणाचे अभ्यासक रामचंद्र भिकाजी जोशी यांचा जन्म. 'व्याकरणाची शिशुबोध','बालबोध व प्रौढबोध' पुस्तके त्यांनी लिहिली आणि 'मराठी भाषेची घटना','मराठी शब्दसिध्दी' असे ग्रंथही लिहिले. भाषाभ्यास शक्य तितका सर्वांगीण करण्याचा प्रयत्न करणारे अभ्यासक असा लौकिक त्यांनी संपन्न केला होता. **१८९१:-** कवी, अनुवादक, प्रकाशक भालचंद्र सुकथनकर उर्फ गुलाबराव सिताराम यांचा जन्म. यांनी लोकमान्यांच्या 'गीता रहस्य' या ग्रंथाचा इंग्रजी अनुवाद केला. तसेच 'इंदुविलास' हा त्यांचा काव्यसंग्रह प्रसिध्द. याशिवाय काही फ्रेंच पुस्तकाची त्यांनी भाषांतर केली. तसेच पंडित भातखंडे यांनी लिहिलेली व संपादित केलेली पुस्तके प्रकाशित केली. **१९०८:-** महानुभाव वाड्:मयाचे अभ्यासक म्हणून मराठी वाड्:मयाच्या क्षेत्रात नावलौकिक संपादन करणाऱ्या विष्णू भिकाजी कोलते उर्फ भाऊसाहेब यांचा जन्म. वकील होऊनही वकिली न करता मराठीचे प्राध्यापक ते प्राचार्य आणि पुढे नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु असा त्यांचा प्रवास झाला. 'लव्हाळी' हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह. यानंतर 'पश्चिम वऱ्हाडातील काही शब्द' ह्यावर लेख लिहिले. पुढे महानुभाव वाड्:मयाचा संशोधनासाठी अनेक सांकेतिक लिप्या शिकून महानुभाव तत्वज्ञान, महानुभावांचा आचारधर्म, महानुभावसंशोधनावर लेखसंग्रह लिहिले. याशिवाय 'भास्कर भट्ट बोरीकर' यांचे चरित्र व काव्यविवेचन, मराठी दीपिका, मराठीच्या अस्मितेचा शोध हे लेख संग्रह हिंदीतून मराठी संतोका सामाजिक कार्य आदी साहित्य त्यांच्या नावावर जमा आहे. 'अजूनि चालतोचि वाट' हे आत्मचरित्रेही त्यांनी लिहिले. काही संपादित साहित्य ही त्यांच्या नावावर आहे. त्यामध्ये नरेंद्र-रुक्मिणी स्वयंवर, म्हाईभट, गोविंदप्रभुचरित्र, दामोदर पंडीत आदींचा समावेश आहे. **१९१५:-** भाषांतरकार, नाटककार, कवी, संस्कृत पंडीत श्रीराम भिकाजी वेलणकर यांचा जन्म. भारतातील 'पिनकोड' चे जनक ही त्यांची आणखी एक ओळख. 'संगीत सौभद्र' सह 'शारदा', 'भाऊबंदकी मिळून २१नाटकांची संस्कृत मध्ये भाषांतर केली. त्यांच्या संस्कृत पुस्तकांची संख्या ६० च्या आसपास आहे. मराठीत 'राधामाझधव' हे सामाजिक व्यंगकाव्य, 'प्रणयधारा' हे प्रणयकाव्य', 'स्मरणसुधा आणि प्राचीन भारतीय भौतिक विज्ञान' असे लेखन त्यांनी केले. १९२६:- लेखक आणि स्वातंत्र्यसेनानी भाई वैद्य यांचा जन्म. त्यांनी लिहिलेली पुस्तके पुढीलप्रमाणे आहेत. ङ्गमंडल आयोगावरील पुस्तकासह संपूर्ण शिक्षण (केजी टे पीजी) मोफत','समान व गुणवतापुर्ण का कसे','परिवर्तनाचे साथी व सारथी','एका समाजवाद्याचे चिंतन' ह्या पुस्तकांसह त्यांची अनुवादीत पुस्तके पुढीलप्रमाणे 'लोकशाही समाजवाद... काल, आज व उद्या', 'अर्थशास्त्रीय आक्रमण', 'अमृतमहोत्सव निमित्ताने आव्हानाशी संघर्ष व परिवर्तनाची दिशा (संपादक ग.प्र.प्रधान) इ. पुस्तके प्रकाशित. **१९२७:-** लेखक आणि थिऑसॉफिकल सोसायटीचे कार्यकर्ते दिवाकर अनंत घैसास यांचा जन्म. यांनी जे. कृष्णमूर्तीच्या अनेक ग्रंथाचा अनुवाद केला असून त्यामध्ये 'आठ संवाद','एक स्वगत संभाषण','अंतरंगाचा बहर','इंडिया','पाच संवाद','प्रथम अर्थात अंतिम मुक्ती खंड १,२,'ज्ञातापासून मुक्ती' याशिवाय 'बृहन्नारदीय पुराणातील श्लोकबध्द पोथीवरुन मराठीत ओवी रचना','श्री गजानन महाराज विजय' हे ओवीरुप चरित्र, 'गणेश कवच','श्रीगणेश गीता','योगेश्वरी कवच','शिवकवच', हे ओवीरुप साहित्य तसेच 'श्रीगणेश पुराण','गणेशव्रत कथा व महात्म्य','जीवनाचे अंतरंग भाग १,२','संक्षिप्त देवी महात्म्य' 'हिसावङ्कच्या पलिकडे' मिळून ४० हून अधिक ग्रंथसंपदा. **१९३५:-** 'माझी अक्षरगाथा','चित्राक्षरं आणि कमलाक्षर' या तीन पुस्तकांद्वारे मराठी अक्षरांना आपण दिलेली वळणे ग्रंथबध्द करणारे अक्षरकार कमल शेडगे यांचा जन्म. गेल्या अर्धशतकात नाटक-चित्रपट जाहिराती, तसेच मुखपृष्ठे यांना शेडगे यांच्या अक्षरांमुळे दृश्यार्थ लाभला. **१९३९:-** साहित्यिक विठ्ठलराव महादेव मोरे यांचा जन्म. ह्यांचा 'चिताक','दवना','इंगित' मिळून दहाच्या आसपास कथासंग्रह. 'थ्रिल्स' या अनुवादित कादंबरीसह 'आडगाळ','झळा','झंगाट' मिळून वीस एक कादंबऱ्या आणि 'इथे फुलांना मरण जन्मता' हा लेखसंग्रह अशी साहित्य संपदा. **१९६५:-** संत साहित्याचे अभ्यासक, लेखक चरित्रकार नरहर शास्त्री सदाशिव खरशीकर यांचे निधन. श्रीमत परमहंस पुरूषोत्तमानंद सरस्वती स्वामी उर्फ श्री विष्णू कवी महाराज यांचे चरित्र त्यांनी लिहिले. याशिवाय श्री विष्णू दासांची कविता खंड २, श्री केशव स्वामीची कविता, आणि महाराष्ट्रातील पहिला लिंगायत संत शांतालिंगकृ त कर्णहंसफ या ग्रंथाचे संपादन त्यांनी केले. **१९७१:-** लेखिका कांती पाटकर यांचा जन्म. 'कळया प्राजक्ताच्या','जुडी एकवीस दुर्वांची' ही पुसतके त्यांची प्रसिध्द झाली आहेत. **१९८४:-** कवी, कथा-कादंबरीकार गजानन लक्ष्मण ठोकल यांचे निधन. त्यांनी लिहिलेला 'गावगुंड' या कादंबरीवर चित्रपटही निघाला. 'टेंभा','ठिणगी' या कादंबऱ्याही त्यांच्या गाजल्या. तथापि कथाकार म्हणून महाराष्ट्राला परिचित. 'कडूसाखर','पहिले चुंबन','सुगंध','क्षितिजाच्या पलिकडे' इत्यादी कथासंग्रह प्रसिध्द. अद्भूतरम्य वातावरण, थरारक घटना आणि रांगडी बेदरकार माणसे यांच्या भोवती त्यांचे कथाविश्व फिरते. याशिवाय 'सुगी' या जानपतगीतांचा संग्रह त्यांनी संपादित केला. **२०१४:-** पुराभिलेख आणि नानकशास्त्र या विषयांचे संशोधन आणि लेखन करणाऱ्या तज्ञ लेखिका डॉ. शोभना गोखले यांचे निधन. 'ब्रुसेल्स' येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या त्या अध्यक्ष होत्या. जागतिक पातळीवर असा बहुमान मिळवणाऱ्या त्या पहिल्या भारतीय संशोधक होत्या.

**- संजय वझरेकर**
९९७५५७६६७५

## चर्चमध्ये चोरी

**पनवेल :** पनवेल शहरातील सेंड फ्रान्सीस न्यू चर्च (सीएनआय) या चर्चमध्ये अज्ञात चोरट्यांनी चोरी करून रोख रक्कम लंपास केल्याची घटना घडली आहे. येथील सेंड फ्रान्सीस न्यू चर्च (सीएनआय) या चर्चच्या पाठीमागील दरवाजा तोडून अज्ञात चोरट्याने आतमध्ये प्रवेश करून चर्चमधील कपाटात असलेल्या दानपेटीमधील पाच हजार रुपये रोख रक्कम चोरुन नेली आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

---

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## e-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https://srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/ 400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1. | E-Tender-15/24-25 /Rfx No.7000031205 | Work of Garden Maintenance at 400 kV Nagothane s/s under 400 kV Nagothane Division..2nd call | Rs 2,74,313/- | 27.06.24 up to 23:59hrs |
| 2. | E-Tender-14/24-25 /Rfx No.7000031707 | supply of 220 kV & 400 kV Discharge Rod at 400 KV Nagothane Substation under 400 KV R.S. O&M Division, Nagothane..2nd call | Rs 2,05,320/- | 27.06.24 up to 23:59hrs |

EMD fee Rs. 5000/- & Tender fee Rs. 500/- + GST For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/ Contact Person: MITESH GOYAL Mob No. 9461456635 Email ID : ee7230@mahatransco.in Note: All eligible supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
**EXECUTIVE ENGINEER, 400kV R.S. (O&M) Dn. Nagothane**

---

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **बोअरवेल-विहिरीसाठी** मशीनद्वारे अचूक भूजल संशोधन-९२२६७६६१२९
- **सहारा ट्रॅव्हल्स अलिबाग मध्ये** स्थानिक ड्रायव्हर पाहिजे वय २५ ते ४५( Jsw duty) ९२७०५६०४५६
- **नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता** आहे. १. वेटर, २. नाश्ता बनवणारा कूक, ३. हाऊस कीपिंग, २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी संपर्क साधावा. (व्हॉटसअॅप वर मेसेज करावा.) ८४०८८२९५५५, ७८७५८६६५५५
- **हार्डवेअर दुकानात मांडवा येथे मुलगी कामाला पाहिजे.** मो. ८००७८९३२३२, ९४२१९५४३४८
- **५०००० रुपये किंमतीचा** CNC मशिन ऑपरेटींगचा कोर्स मोफत, मोफत, मोफत, पात्रता १२ वी किंवा १५ वी पास, वयोमर्यादा-३० वर्षे पर्यंत. पगार-१०००० रुपये, ८ तास ड्युटी, संपर्क- ९०४९६५५५२३
- **उत्तर भारतीय शाकाहारी स्वयंपाकी (वय ३५ ते ४५)**- कर्जत लहान कुटुंब संपर्क करा- ९८२१२२५५५८ सकाळी ८ ते दुपारी १२ दुपारी ४ ते रात्री ८ दरम्यान

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने कळविण्यात येते की,

आमचे अशिल यांनी मा. उप संचालक भुमी अभिलेख, कोकण प्रदेश सो. मुंबई यांचे कडे रिव्हीजन अर्ज केला आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचा तपशील**

| गावाचे नाव | सर्व्हे नं. | क्षेत्र | गट नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| धोकवडे | १०३/५/अ | ०-२२-० | ७८८ | ०-२६-६ |
| | १०३/५/ब | ०-३३-० | ७८९ | ०-२५-१ |
| | १०३/५/क | ०-२२-० | ७९० | ०-२५-३ |

वरील मिळकती मध्ये कोणाही भाग विकत घेण्याचा असल्यास सदर मिळकती मध्ये वाद चालू आहेत तरी त्याबाबत वरील मिळकतीच्या प्रत्येक मालकास त्यांची पूर्ण कल्पना आहे. तरी देखील सदरची मिळकत यामध्ये आकारफोड मध्ये तफावत आहे त्यामुळे विकत घेणाऱ्या व्यक्तीस हया पुढे त्याचा परिणाम भोगावा लागेल तरी सदरची मिळकत विकत घेण्याची असल्यास त्या अधि खाली दिलेल्या नंबर वर संर्पक करावा. तसेच होणारा नुकसान भरपाईस खालील सही करणार हे जबाबदार राहणार नाही.

हे कळावे.

सही/-
**अॅड. रुणल बी. पाटील**
अलिबाग- रायगड
मो. बा. ९१५८९३०३५५

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की माझे अशिल यांनी मौजे माणगाव ठाकूरवाडी, ता.कर्जत, जि.रायगड येथील खाली नमूद केलेली शेतजमीन मिळकती विकत घेण्याचे निश्चित केले आहे तरी सदर मिळकतीसंदर्भात कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध, गहाण, दान, करार, बक्षिस, अगर पोटगीहक्क व अन्य इजमेंटरी हक्क अगर कोणत्याही स्वरूपाचे हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर त्यासंबंधी कागदपत्रांसह लेखी निवेदन सादर करावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.

| शेतजमीन मालकाचे नाव | गट नं./स.नं./हि.नं. | एकुण क्षेत्र हे.आर.प्र | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| १. उषा हरीश म्हात्रे | २२/१ | ०.५८.०० | ०.२८ |
| २. नयन हरीश म्हात्रे | २२/२ | ०.९४.०० | ०.७५ |
| ३. विरेश हरीश म्हात्रे | २२/३ | १.७३.०० | ०.८७ |
| ४. अंकिता हरीश म्हात्रे | २२/४ | ०.७१.०० | ०.३७ |
| ५. कामिनी दिपक म्हात्रे | २२/६ | २.७५.०० | १.४५ |
| ६. योगेश दिपक म्हात्रे | २२/७ | १.१२.०० | ०.५९ |
| ७. अनिश दिपक म्हात्रे | २२/८/अ | ०.८६.०० | ०.३६ |
| ८. आकांक्षा जयदीप केणे | २२/९ | १.३२.०० | ०.७५ |
| | २२/१० | ०.९४.०० | ०.५३ |

पत्ता: मु. पो. चिंचवळी ता. कर्जत जि. रायगड
मो.नं.९०४९४८६८०५

सही/- अॅड उमेश आनंद भगत

---

### जाहीर नोटीस

सर्व नोटीसोने संबंधितांना असे कळविण्यात येते की आमने अशिलांनी माजे वरसोली, ता. अलिबाग येथील खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत सौ. भारती शंकर म्हात्रे यांच्याकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| वरसोली ता. अलिबाग, जि. रायगड | १७७/२/१८ | ३-४८-५० | ३४-८५ |

तरी वरील बिनशेती मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे अॅडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकती निर्वेध व बिनजोखमी आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचं अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि. २१.६.२०२४

**अॅड. विजय अनंत पेढवी**
मु.नांदाईपाडा, पो. झिराड,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९८२२१८६७४०

---

### तहसिलदार तथा शेतजमिन न्यायाधिकरण कर्जत यांचे न्यायालयात
### ता. कर्जत जि. रायगड

कुळवहीवाट ३२ग दावा क्र.२०/२०२४

**जाहीर पेपर नोटीस**

१. श्रीम. काळुबाई दामु ठोंबरे
२. श्री. गोपाळ दामु ठोंबरे
३. श्रीम. जिजाबाई अशोक भोईर
४. श्रीम. बारकी दामु ठोंबरे — अर्जदार
५. श्रीम. मारुती दामु ठोंबरे
६. श्री. सुरेश दामु ठोंबरे
रा. मु. ठोंबरवाडी, कडाव ता. कर्जत जि.रायगड

विरुध्द

१. श्री. परशुराम दामोदर वैद्य — सामनेवाले
रा. कर्जत ता.कर्जत जि.रायगड

तमाम जनतेस तसेच सामनेवाले/प्रतिवादी यांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे मार्केवाडी, ता. कर्जत जि. रायगड या जमिन मिळकती संदर्भात ३२ग अन्वये अर्ज दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये दिनांक ०६/०६/२०२४ रोजी प्रथम सुनावणी घेण्यात आलेली आहे. मात्र सामनेवाले हे या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर दाव्याची पुढील सुनावणी दि. २०/०६/२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता तहसिल कर्जत जि. रायगड येथे निश्चित करण्यात आली आहे.

सबब या जाहीर नाटीशीद्वारे सामनेवाले यांना तसेच वरील जमीन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींना ७ दिवसांच्या आत तहसिल कार्यालय कर्जत, जि. रायगड येथे समक्ष येऊन आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल कारावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**दावा मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| मौजे. मार्केवाडी ता. कर्जत जि.रायगड | ४/१० | ०.०६.०० | ०.०५ |

ठिकाण - कर्जत
दिनांक -१८/०६/२०२४

सही/-
**(डॉ. शीतल रसाळ)**
शेतजमीन न्यायाधिकरण
तथा तहसिलदार कर्जत

---

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या जमीन मिळकती जमीन मालक श्री. चंद्रकांत हिरालाल शहा यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे उंबरविरा, ता. खालापुर, जि. रायगड.**

| अ. क्र. | सर्व्हे नं./ हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे. आर. पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| १. | १/४ | ०.४४.००<br>पो. ख. ०.०२.००<br>एकूण ०.४६.०० हे.आर.पॉ. | ०.५० |
| २. | १/६ | ०.१५.००<br>पो.ख. ०.०२.००<br>एकूण ०.१७.०० हे.आर.पॉ. | ०.१५ |
| ३. | १/१३/अ | ०.०६.०० | ०.०९ |
| ४ | १/१३/ब | ०.०५.०० | ०.०६ |
| ५ | १७/१/ब | ०.३१.००<br>पो.ख. ०.०६.००<br>एकूण ०.३७.०० हे.आर.पॉ. | ०.०५ |
| ६ | १६/२ | ०.१६.४०<br>पो.ख. ०.००.५०<br>**एकूण ०.१६.९० हे.आर.पॉ.** | २.६० |

तरी वरील मिळकतींमध्ये इतर कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास, सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीशीच्या मुदतीत हरकत न आल्यास, सदर मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून, आमचे अशील सदर मिळकतींचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक : २२/०६/२०२४

सही/
**अॅड. निता नरेश बैलमारे**
मो. ९२२६३३१५२६
ऑफीस : शॉप नं.१५, सनराईज अपार्टमेंट,
कचेरी रोड, कर्जत, जि. रायगड -४१० २०१

---

### तहसिलदार तथा शेतजमिन न्यायाधिकरण कर्जत यांचे न्यायालयात
### ता. कर्जत जि. रायगड

कुळवहीवाट ३२ ग दावा क्र. २१/२०२४

**जाहीर पेपर नोटीस**

१. श्री. सुरेश दामु ठोंबरे.
रा. मु. ठोंबरवाडी, कडाव ता. कर्जत जि.रायगड — अर्जदार

विरुध्द

१. श्रीम. कमलाबाई दामोदर वैदय
२. श्रीम. सुनिता मुकुंद काळे
३. श्रीम. निला गणेश जोशी
४. श्रीम. प्रभा वामन लव्हाटे — सामनेवाले
५. श्रीम. रोहिणी सुधाकर लिमये
६. श्रीम. पदमा शरद बेडेकर
रा. कर्जत ता. कर्जत जि. रायगड

तमाम जनतेस तसेच सामनेवाले/प्रतिवादी यांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे तांबस, ता.कर्जत जि.रायगड या जमिन मिळकती संदर्भात ३२ अन्वये अर्ज दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये दिनांक ०६/०६/२०२४ रोजी प्रथम सुनावणी घेण्यात आलेली आहे. मात्र सामनेवाले हे या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर दाव्याची पुढील सुनावणी दि. २०/०६/२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता तहसिल कर्जत, जि. रायगड येथे निश्चित करण्यात आली आहे.

सबब या जाहीर नाटीशीद्वारे सामनेवाले यांना तसेच वरील जमीन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींना ७ दिवसांच्या आत तहसिल कार्यालय कर्जत, जि. रायगड येथे समक्ष येऊन आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**दावा मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| मौजे- तांबस ता. कर्जत जि.रायगड | १५/१क | ०.५६.०० | ८.८८ |

ठिकाण : कर्जत
दिनांक : १९/०६/२०२४

सही/-
**(डॉ. शीतल रसाळ)**
शेतजमीन न्यायाधिकरण
तथा तहसिलदार कर्जत

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील हे खालील वर्णनाच्या मिळकती, मिळकतींचे खालील विदयमान मालक यांचे कडून कायम खरेदी करणार असून, बोलणी आमचे अशिल व मिळकतीचे मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे खडसांबळे, ता. सुधागड, जि. रायगड**

| मिळकत मालकाचे नाव | सर्व्हे नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| श्री. जॉन शिबी मॅथ्यु रा. रा. गोरेगाव पश्चिम | २२१/१ | ०-४६-०० | २.०३ |
| | २२१/४ | ०-१४-७० | ०.१९ |
| | २१५/४/ब | ०-१७-४० | २.१६ |
| | २२४/१ | ०-२०-२० | १.५३ |
| श्री. भिवा केरू साळुंखे रा. ठाणे पश्चिम तर्फे अखत्यारी श्री. जॉन शिवी मॅथ्यु रा. गोरेगाव पश्चिम | २१५/४/अ | ०-१७-२० | २.१५ |

वरील मिळकती पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक यानी आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतींमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वानी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक २२/०६/२०२४

सही/-
**अॅड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर
पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मो. नं. ९४०३३०५२५०

---

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, १) श्री. जगन्नाथ महादेव गुर्जर पाध्ये २) श्री. शामकांत महादेव गुर्जर पाध्ये ३) श्री. रमाकांत महादेव गुर्जर पाध्ये ४) श्री. श्रीकांत महादेव गुर्जर पाध्ये हे मौजे देहरंग, ता. पनवेल जि. रायगड येथील खाली वर्णन केलेल्या मिळकतींचे कै. महादेव वासुदेव गुर्जर पाध्ये यांच्या मृत्युपत्रान्वये सामायिक मालक व कब्जेदार झाले असुन आमचा सदर मिळकतींमध्ये प्रत्येकी १/४ इतका अविभक्त हिस्सा आहे. खाली नमुद केलेल्या मिळकतींबाबत मा. दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर सो. यांचे कोर्टात रे.मु.नं.७०/२०१२ (जुना स्पे. मु.नं.४७/१९९९) हा दावा तसेच प्रतिदावा प्रलंबित आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं./हि. नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| देहरंग ता. पनवेल | ५/२ | ४-१३-८०<br>पो. ख १-१९-४०<br>एकुण ५-३३-२० | ६.५६ |
| देहरंग ता. पनवेल | ५/४ ब | ४.५२.२० | ६.७७ |

सदर मिळकतींचे आजपर्यंत आम्हा चौघांमध्ये सरस-निरस वाटप झालेले नाही व सर्व मिळकती या एकत्रातच कसल्या जात आहेत. तसेच सदर मिळकतींचा ताबा आमच्याकडेच आहे. असे असताना श्री. निरंजन सुधाकर प्रभुघाटे वगैरे ३४ यांनी बेकायदेशीरपणे सदर मिळकतींमध्ये श्री. कौस्तुभ जनार्दन माळी, श्री. सुरेश गोपाळ फडके, मे. झरांग हौसींग प्रा.लि. तर्फे राजीव मेवालाल रजाक, श्रीमती. वासंती रामा म्हात्रे, श्री. अंकुर बाबासाहेब बामणे व श्रीमती. अंजली अंकुर बामणे या त्रयस्थ इसमांचा हक्कहितसंबंध निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. सदरचे त्यांचे कृत्य हे बेकायदेशीर असून त्यास आमची कुणाचीही कोणत्याही प्रकारे संमती नाही. तसेच आम्ही त्यांचे विरुध्द दिवाणी व फौजदारी कारवाई सुरू केली आहे.

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतींसंदर्भात व्यक्ती, व्यक्तींचा समुह, सहकारी संस्था, पतपेढ्या, बँका, इतर आर्थिक संस्था, यापैकी कुणीही गहाण, विक्री, विक्रीचा करार, भाडेपट्टा, या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये व वरील मिळकतींचेपोटी कोणत्याही प्रकारच्या रकमा कर्ज अथवा बयाणा म्हणून देऊ नये. त्यास आमची सक्त हरकत आहे याची सर्व संबंधितांनी दखल घ्यावी.

मात्र या नोटीसीस न जुमानता कुणीही श्री. निरंजन सुधाकर प्रभुघाटे वगैरे ३४ तसेच श्री. कौस्तुभ जनार्दन माळी, श्री. सुरेश गोपाळ फडके, मे. झरांग हौसींग प्रा.लि.तर्फे राजीव मेवालाल रजाक, श्रीमती. वासंती रामा म्हात्रे श्री. अंकुर बाबासाहेब बामणे व श्रीमती. अंजली अंकुर बामणे यांचेबरोबर वर वर्णन केलेल्या मिळकतींसंदर्भात कोणत्याही प्रकारचा व्यवहार केल्यास तो आमचेवर बंधनकारक रहाणार नाही व अशा कोणत्याही व्यवहाराची जबाबदारी आम्ही कोणत्याही परिस्थितीत स्विकारणार नाही. किंबहूना तशा प्रकारचा कोणताही व्यवहार केल्याचे आमचे निदर्शनास आल्यास आम्ही सर्व संबंधितांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करू, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ता. २२/६/२०२४

१) श्री. जगन्नाथ महादेव गुर्जर पाध्ये
२) श्री. शामकांत महादेव गुर्जर पाध्ये
३) श्री. रमाकांत महादेव गुर्जर पाध्ये
४) श्री. श्रीकांत महादेव गुर्जर पाध्ये
रा. डोबिंवली ता. कल्याण, जि. ठाणे

---

### जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आम्ही खाली अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणीत मालमत्तांसंदर्भात (सदर मालमत्ता) श्री. कुणाल किरणभाई शाह यांचे हक्क, अधिकार व हितसंबंधांची चौकशी करीत आहोत.

कोणाही व्यक्तीचा सदर मालमत्ता व /वा त्यांच्या कोणत्याही भागासंदर्भात विक्री, विनिमय, हस्तांतरण, भाडेकरार, उप-भाडेकरार, गहाण, भेट, वहिवाट, लिव्ह अॅन्ड लायसेन्स, न्यास, उत्तराधिकार, मृत्यूपश्चात वारसा, ताबा, तारणगहाण, प्रभार, धारणाधिकार, सुविधाधिकार वा अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही हक्क, अधिकार वा हितसंबंध असल्यास त्यांनी त्यासंदर्भात लिखित स्वरूपात अधोहस्ताक्षरितांना naheed.carrimjee@ddcm.in/ggp_adv@yahoo.in या ई-मेल आयडीवर सूचित करावे तसेच अशा लिखित बाबींच्या कागदोपत्री प्रती खालील निर्देशित पत्त्यावर सदर प्रसिद्धी दिनांकापासून १५ दिवसाच्या आत कागदोपत्री पुराव्यासहित/साक्ष्यांसहित सादर करावे अन्यथा असे कथित दावे /हरकती, हितसंबंध वा मागण्या या सर्व हेतूने व दृष्टीने अधित्यागित व /वा परित्यागित समजण्यात येतील व त्यानुसार व्यवहार पूर्ण करण्यात येईल.

**वरील संदर्भित अनुसूची**

१) पुढील विवरणीत बिगरशेतजमिनीचा सर्व तो भाग व भूखंड - **गट क्र. २०६/२/५,** मोजमापित अंदाजे ३-४१-०० चौ. मी., ३४.१० (रु. पै.) मूल्यावर करनिर्धारित, ग्रूप ग्रामपंचायत किहिम घर क्र. १८०७ समवेत, त्यावर निर्मित घर साधारण १३६.८५ चौ. मी., गाव किहिम, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, नोंदणीकरण जिल्हा रायगड व उपजिल्हा अलिबाग, जिल्हा परिषद अलिबागची स्थानिक हद्द, पंचायत समिती अलीबाग व ग्रूप ग्रामपंचायत किहिम येथील व सीमा पुढीलप्रमाणे :

**गट क्र. : २०६/२/५ च्या सीमा पुढीलप्रमाणे :**

पूर्वेस वा त्या दिशेस : श्री. नरहरी घोसाळकर यांच्या मालकीची जमीन
पश्चिमेस वा त्या दिशेस : अंतर्गत रस्ता
दक्षिणेस वा त्या दिशेस : गट क्र. ६०४ सी चा भूखंड क्र. ८
उत्तरेस वा त्या दिशेस : गट क्र. २०६/२/६

२) पुढील विवरणीत बिगरशेतजमिनीचा सर्व तो भाग व भूखंड - **गट क्र. २०६/२/६,** मोजमापित अंदाजे ३-५१-०० चौ. मी., ३५.१० (रु.पै.) मूल्यावर करनिर्धारित, गाव किहिम, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड नोंदणीकरण जिल्हा रायगड व उपजिल्हा अलिबाग, जिल्हा परिषद अलिबागची स्थानिक हद्द, पंचायत समिती अलिबाग व ग्रूप ग्रामपंचायत किहिम येथील व सीमा पुढीलप्रमाणे :

गट क्र. : २०६/२/६ च्या सीमा पुढीलप्रमाणे :

पूर्वेस वा त्या दिशेस : श्री. नरहरी घोसाळकर यांच्या मालकीची जमीन
पश्चिमेस वा त्या दिशेस : अंतर्गत रस्ता
दक्षिणेस वा त्या दिशेस : गट क्र. २०५/२/६
उत्तरेस वा त्या दिशेस : जुना गट क्र. ६०४ व भूखंड क्र. ७


**दिनांक : २२.०६.२०२४**

**देसाई देसाई करीमजी अॅन्ड मुल्ला**
(एन. टी. करीमजी)
८१, फ्री प्रेस हाऊस,
२१५, फ्री प्रेस जर्नल मार्ग,
नरिमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२१.

---

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग*
*दागिने-नविन डिझाइन्स*



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

---

अॅड. ऋषिकेश अनिल कांबळे अॅडव्होकेट बि.ए.एल.एल. वि
रा. कुंभारआळी, नेरळ ता. कर्जत जि. रायगड मो. नं ९५६१७३४३७७

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे कोठींबे ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती जमिन मिळकत, सदर मिळकतीचे मालक सौ. रेखा मधुकर कामत व श्री. मधुकर रामदास कामत यांचेकडुन विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | प्लॉट नंबर | क्षेत्रफळ चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १३७ | ५८ | २८२.०० | २८.२० |
| १३७ | ४ | २९४.०० | २९.४० |

सबब सदर व्यवहारा बाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २१/०६/२०२४

सही/-
**अॅड. ऋषीकेश अनिल कांबळे**
बी.ए.एल.एल.बी.
नेरळ, कुंभार आळी,
जिल्हा परिषद शाळेसमोर,
ता. कर्जत, जि. रायगड मो.नं. ९५६१७३४३७७

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे उमरोली, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक जैतु उदऱ्या घारे कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे :-

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे. आर) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ६० | ३ | ०-१२-४० | ०=२८ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठे करार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अॅटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक २१/०६/२०२४

**अॅड. महेश मोतीराम घारे**
मु. सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८८१८५८६५४
९२७१८६९२०२

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक विद्या ऋषिकेश गायकवाड व इतर २ यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे कुशिवली, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग/ सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ४९/२/अ | ०-५१-३० हे आर पॉ<br>यापैकी क्षेत्र ०-२६-०० हे आर पॉ | ३-२५ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार अॅडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हवक हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी- विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २२/०६/२०२४

**अॅड. निलेश कान्हु मोरे** मोबा. ९८२२६९११०९
**अॅड. वृषाली रघुनाथ मोरे** मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता - शॉप नं. २९, तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे नागांव खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक मंगेश चंद्रकांत चव्हाण सावरकर मार्ग, प्रभादेवी मुंबई - ४०० ०२५ यांच्या नांवे असलेली खुद्द मालकी हक्काची व त्यांचे ताबे कब्जातील व वहिवाटीतील खालील वर्णन केलेली मिळकत माझे स्नेही यांना कायमस्वरूपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| नागांव ता. अलिबाग जि. रायगड | १७१५ | ०-१५-२०<br>पो.ख. ०-०१-५०<br>एकुण क्षेत्र ०-१६-७० | ३.३० |

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहु मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासुन चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहु मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे, असे गृहित धरून माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

तारीख :- २१/०६/२०२४

सही/-
**श्री. किशोर वामन तेलंगे**
पत्ता : श्री साई कन्सल्टंन्सी, दुय्यम निबंधक
अलिबाग कार्यालयासमोर गाळा क्र. ३,
ता.अलिबाग, जि.रायगड मो. नं. ९८२२३४८१७३, ८८०७३२८६४६










# पीएनपी संकुलात जागतिक योग दिन साजरा

## चित्रलेखा पाटील यांची प्रमुख उपस्थिती



● ( छायाचित्र अमोल नाईक )

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

पीएनपी संकुलात आंतरराष्ट्रीय जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. शारीरिक आणि मानसिक समृद्धी प्रदान करणारा योगा हा आज जागतिक स्तरावर माणसाचे जीवन समृद्ध करणारी नवी संजीवनी ठरत आहे. आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून २१ जून रोजी पीएनपी वेश्वी संकुलात सर्व इंग्रजी, मराठी माध्यमांच्या शाळा, कॉलेज विद्यार्थ्यांनी योगा डे साजरा केला. या प्रसंगी संकुलातील विद्यार्थ्यांनी बसून व उभे राहून वेगवेगळी आसने केली तसेच योगामधून नृत्याविष्काराचे सादरीकरण करुन उपस्थितांना संदेश दिला.

योगा प्रशिक्षक सिद्धी वाकडे यांनी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले. यावेळी संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, पीएनपी वरिष्ठ महाविद्यालय प्राचार्य डॉ. ओमकार पोटे, कनिष्ठ महाविद्यालय प्राचार्य रविंद्र पाटील, होली चाईल्ड सीबीएसईच्या मुख्याध्यापिका व्ही. वेणी, उपमुख्याध्यापिका सदाफ शहाबाजकर, होली चाईल्ड स्टेट बोर्डच्या मुख्याध्यापिका निसर्गा चेवले, माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक निलेश मगर, पूर्व प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका रिना म्हात्रे, प्रा. वृतिषा पाटील, इंग्रजी माध्यम ॲकॅडमिक को ओर्डीनेटर श्रुती सुतार, मनिषा रेलकर संकुलातील शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी आदि मोठ्या संख्येने उपस्थित होते.



● मुरूडच्या अंजुमन इस्लाम जंजिरा महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिवस.



● शेठ जे.एन.पालीवाला महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी जाणले योगाचे महत्त्व.



● अलिबाग : जन शिक्षण संस्थान रायगडच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा



● मरूड सर.एस.ए.हायस्कुलमध्ये जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी योगासनांची प्रात्यक्षिके करुन उपस्थित मान्यवरांचे लक्ष वेधून घेतले.



● नेणवली : नेणवली शाळेत योगोत्सव उत्साहात साजरा



● रोहा क्रीडा संकुलच्या वतीने धाटाव औद्योगिक विद्यालयात योग दिन



● कोलाड येथे योग दिन साजरा



● नागाव येथे आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा.



● म्हसळा मराठी शाळेत आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात



● जासई हायस्कूलमध्ये योग दिन साजरा



● नांदगाव येथील छत्रपती शिवाजी विद्यालयात योग दिन साजरा



● योगदिनानिमित्त नांदगाव हायस्कूलमध्ये योगा करताना विद्यार्थी-विद्यार्थीनी



● चिल्हे येथे जागतिक योग दिवस उत्साहात



● लायन्स क्लब पनवेलतर्फे योगदिन



● १० वा आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रम अलिबाग पोलीस मुख्यालयातील जंजिरा हॉल येथे संपन्न झाला.



● ओंकार विद्या मंदीर येथे योग दिन साजरा



● वीर वाजेकर महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा.



● मेडीकवर हॉस्पिटलमध्ये योग दिन



● डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी महाविद्यालयात योग दिन साजरा



● द्रोणागिरी हायस्कूल करंजा विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा

GOVERNMENT OF INDIA
DIRECTORATE OF CASHEWNUT AND COCOA DEVELOPMENT COCHIN
Press Release
Directorate plans to take up cashew area expansion programmes in Raigad and Palghar districts of Maharashtra state for the year 2024-25. Agencies like FPO's, Farmers Cooperative Societies, NGO's registered with NITI Aayog and empanelled NGOs under State Horticulture Mission may send the details of their organization through e-mail **dccd@nic.in** within 10 days after publication of the advertisement. Agencies should have minimum experience of 5 years in implementing various development programmes under Plantation / Horticulture sector. For any queries, you may contact **Ph: 0484-2377151.**
Sd/-
**Dr. Femina**
Director

# वैशिष्ट्यपूर्ण याक

**दोस्त हे मस्त**

हिमालयाच्या परिसरात मोठ्या प्रमाणात जैवविविधता आढळते. इथलं प्राणीविश्वही वैविध्यपूर्ण आहे. हिमालयातल्या थंड वातावरणाचा सामना करता यावा यासाठी इथल्या प्राण्यांच्या अंगावर भरपूर केस असतात. या भागात आढळणारा एक प्राणी म्हणजे याक. बैलासारखा दिसणारा हा एक केसाळ प्राणी. दक्षिण-मध्य आशियात याक आढळतात. भारतासह तिबेट, मंगोलिया आणि रशियापर्यंत त्यांचा अधिवास आहे. या भागातले याक माणसाळलेले, पाळीव असतात. जंगली याकची प्रजातीही अस्तित्त्वात आहे पण त्यांची संख्या हातांच्या बोटांवर मोजण्याइतकीच आहे.

याक हा प्राणी कमी तापमानाशी अगदी सहज जुळवून घेतो. शरीराच्या वैशिष्ट्यपूर्ण रचनेमुळे त्यांना हे शक्य होतं. गायी, म्हशींच्या तुलनेत याकचं फुफ्फुस आणि हृदयाचा आकार बराच मोठा असतो. ऑक्सिजनची कमतरता असणाऱ्या या भागात राहात असल्याने याकच्या शरीरात ऑक्सिजनचा प्रवाह कायम सुरू असतो. त्यांच्या शरीरात विशिष्ट प्रकारचं हिमोग्लोबिन तयार होतं. यामुळे थंड वातावरणाशी जुळवून घेणं त्यांना शक्य होतं. याक उष्ण तापमानाशी जुळवून घेऊ शकत नाहीत. १५ अंश सेल्सियसपेक्षा जास्त तापमानाचा त्यांना त्रास होतो. त्यांच्या शरीरात घामाच्या ग्रंथी नसतात. थंड प्रदेशात याकच्या दुधाचा वापर होतो. तिबेट आणि काराकोरम भागात याकचे खेळही आयोजित केले जातात. याकच्या शर्यती लावल्या जातात. याक हा या परिसरातल्या संस्कृतीचा महत्त्वाचा भाग मानला जातो.



# परवानगी घेतली का?

**अजब गजब**

भारतातील नागरिकांना विहार स्वातंत्र्य आहे. भारतामध्ये विनापरवानगी हवं तिथे फिरु शकतात. पण मित्रांनो, हे पूर्ण सत्य नाही. भारतात अशी काही ठिकाणं आहेत जिथे जाताना रितसर परवानगी घ्यावी लागते. अशाच काही ठिकाणांबद्दल...

✻ अरूणाचल प्रदेशमधील तवांग जिल्ह्यामध्ये जाण्यासाठी पर्यटकांना परवाना घ्यावा लागतो. या ठिकाणी बुद्धाची मंदिरं आहेत. जवळपास ४०० वर्षं जुनं बुद्ध मंदिर इथे आहे. हे मंदिर पाहण्यासाठी देश-विदेशातल्या पर्यटकांची गर्दी होते. इथे ठराविक कालावधीसाठीच फिरता येतं.

✻ भलुकपोंग हे अरूणाचल प्रदेशमधील एक सुंदर ठिकाण. अरूणाचल प्रदेशालगत चिनी सीमा असल्याने इथे जाण्यासाठी परवानगी घ्यावी लागते.

✻ अरूणाचल प्रदेशातच बोमदिया नावाच्या जिल्ह्यात जायला परवाना घ्यावा लागतो.


✻ जगातल्या सुंदर ठिकाणांपैकी एक असणाऱ्या नागालँडमधल्या कोहिमामध्ये जाण्यासाठी रितसर परवानगी घ्यावी लागते.

✻ नागालँडमधल्या दिमापूरमध्ये जाण्यासाठीही तुमच्याकडे परवानगीपत्र हवं.

✻ नागालँडमधल्या मोकोकचुंगमध्ये जायचं असेल तर तुमच्याकडे परवानगी असायला हवी. हे ठिकाण पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांना निवांत वेळ घालवता येत नाही.

✻ नागालँडमशील पेरेन येथे भरणाऱ्या सांस्कृतिक महोत्सवात नागा संस्कृतीचं दर्शन घडतं. पण इथे येण्यासाठी तुमच्याकडे परवानगी हवी.






# दर १० वर्षांनी वितळतोय बर्फ!



**असं का?**

उत्तर अटलांटिकच्या पाण्यातील बदलांचा आर्क्टिक महासागराच्या तापमानावर परिणाम होतो. शास्त्रज्ञांनी या प्रक्रियेला आर्क्टिक महासागराचे 'अटलांटिफिकेशन' म्हणजेच अटलांटिकीकरण असे नाव दिले आहे. २००७ पासून आर्क्टिक महासागराचा बर्फ मोठ्या प्रमाणात वितळला आहे.

आर्क्टिक महासागराचे अटलांटिकीकरण आर्क्टिक द्विध्रुवामुळे झाल्याचे शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे. आर्क्टिक द्विध्रुव हा दाबाचा नमुना आहे. यामुळे उत्तर अमेरिकेतील आर्क्टिक प्रदेशांवर उच्च दाब आणि युरेशियाच्या आर्क्टिक प्रदेशांवर कमी दाब निर्माण होतो. आर्क्टिक द्विध्रुवामुळे दक्षिणेकडील वारे वेगाने आर्क्टिक महासागरात पोहोचतात आणि त्यामुळे तेथील बर्फ वेगाने वितळतो. हा प्रकार २००७ मध्ये घडला होता. तेव्हा ४.१३ दशलक्ष चौरस किलोमीटर बर्फ वितळला होता. अहवालानुसार, दर १० वर्षांनी आर्क्टिकचा १२.६% बर्फ वितळत आहे. सागरी प्रवाहाचा वेग कमी झाल्यामुळे पॅसिफिक महासागरातील भारतीय मान्सून आणि एल निनो पॅटर्नवर परिणाम होत आहे. ग्रीनलँडवरील बर्फाचे नुकसान होण्याची सर्वात भयावह शक्यता आहे.

# आकाशदर्शनाची आवड आहे?

**जाणून घ्या**

पावसाळा असल्यामुळे सध्या आकाश मेघाच्छादित आहे. पण हा ऋतू संपला की स्वच्छ निरभ्र आकाश दिसू लागेल. अर्थात आकाशदर्शन करायचं तर माहितीही हवी. यासाठी अमेझिंग स्पेस डॉट कॉम या साईटला भेट देता येईल. या साईटवर आपल्या अवकाशाविषयीची सगळी माहिती उपलब्ध आहे. या साईटला भेट दिल्यावर तुमच्यासमोर माहितीचा खजिना खुला होईल. कृष्णविवरापासून सूर्यमालेतल्या प्रत्येक ग्रहाची माहिती या साईटवर उपलब्ध आहे. या साईटवर वेगवेगळे विभाग आहेत.



दुर्बिणीच्या मदतीने आकाशदर्शन करण्याबद्दलची माहितीही यात आहे. आकाशगंगा, गुरूत्त्वाकर्षण, कृष्णविवर, आपली सूर्यमाला, तारे तारका, तारकासमूह, विविध दुर्बिणी, अंतराळ मोहिमांबद्दलची सगळी माहिती तुम्हाला मिळू शकेल. अवकाश विज्ञानाचा इतिहासही इथे जाणून घेता येईल. इथे तुम्हाला ऑनलाईन माहितीही मिळू शकते. तुमच्या मनातले प्रश्न विचारता येतील. तुम्हाला समाधानकारक उत्तरं मिळू शकतील. यावर काही व्हिडिओही आहेत. तुम्हाला आकाशदर्शनाची आवड असेल किंवा या क्षेत्रात करिअर करायची इच्छा असेल तर या साईटला भेट देता येईल. या साईटमुळे अभ्यासातही तुम्हाला मदत होईल.

# गेम्सची मजा लुटा

**टेक फन**




तुम्हाला स्मार्टफोनवर गेम्स खेळायला आवडतं ना? या खेळांची आवड नसणारे विरळच... पण असे गेम्स डाऊनलोड करायचे तर बॅटरी आणि स्पेस खर्च होते. नव्या गेमचं आकर्षण काही दिवस टिकून राहतं. पण नंतर गेम्स खेळण्याचा कंटाळा येतो. हे गेम्स फोनमध्ये पडून राहिल्याने जागा व्यापली जाते आणि डिलिट मेमरी असा मेसेज येतो. पण बॅटरी आणि जागेची बचत करणारे काही गेम्स आहेत. हे गेम्स डाऊनलोड करून तुम्ही निश्चिंत राहू शकता...

✻ फ्लॉपी बर्ड हा ४.३ एमबी आकाराचा गेम आहे. हा जुना गेम आहे. फ्लॉपी बर्ड खूपच लोकप्रिय ठरला आहे. यात एक तबकडी उडते. अडथळ्यांचा सामना करून त्या तबकडीला योग्य ठिकाणी पोहोचवायचं आहे.




✻ आपल्याला मुंग्यांचा खूप राग येतो. अँट स्मॅशर या गेममध्ये मुंग्यांना मारायचं आहे. इकडे तिकडे पळणाऱ्या मुंग्यांना आपल्याला मारायचं आहे. मुंग्या मारणं सोपं नक्कीच नाही. हा गेम फ्रूट निंजाप्रमाणे खेळायचा आहे.

✻ गेम खेळण्यासोबतच डोकं चालवायचं असेल तर ब्रेन एज टेस्ट हा गेम खेळायला हवा. या गेमचा आकार ३.२ एमबी एवढाच आहे.

✻ स्केटिंगची आवड आहे पण रहदारीच्या रस्त्यावर स्केटिंग करता येत नाही. मग तुम्हाला स्केटिंग बॉय हा गेम खेळता येईल. हा गेम सबवे सर्फरसारखा आहे.

✻ रेसिंग गेम खेळायची मजा काही औरच असते. रेसिंग मोटो या गेममध्ये वेगाची आवड पूर्ण करता येईल. यात स्पीडोमीटर आहे. स्पीडोमीटरच्या मदतीने

# ॲपलची भन्नाट फीचर्स

**टेक्नॉलॉजी**

मित्रांनो. ॲपल कंपनीचे फोन नवनवीन फिचर्ससाठी ओळखले जातात. आताही ॲपलच्या आयओएस-१८ फीचर अपडेटसह नवीन फीचर्स रिलीज केले जाणार आहेत. कंपनीने आय ट्रॅकिंग तंत्रज्ञान, म्युझिक हॅप्टिक्स आणि व्होकल शॉर्टकट यासारखी फीचर्स आणली आहेत. वर्षाच्या अखेरीस आयओएस १८ अपडेटसह बाजारात येतील.



✻ आय ट्रॅकिंग फीचर- नवीन अपडेटमध्ये आय ट्रॅकिंग फीचर देण्यात येणार आहे. यामुळे दिव्यांग वापरकर्ते ॲपलचे आयपॅड-आयफोन वापरू शकतील. वापरकर्ते फ्रंट कॅमेराद्वारे डोळ्यांच्या हालचालींनी ॲप्स नेव्हिगेट करू शकतील. यासाठी वापरकर्त्यांना इतर कोणत्याही हार्डवेअरची गरज भासणार नाही.

✻ संगीत हॅप्टिक्स फीचर- ऐकू न येणाऱ्या किंवा कमी ऐकू येणाऱ्या वापरकर्त्यांसाठी हॅप्टिक्स फीचर आणले जाईल. ते चालू केल्यावर संगीत ऐकू येईल, त्यानुसार मोबाईल फोनमध्ये टॅप्स, टेक्स्चर्स, व्हायब्रेशन जनरेट होईल.

✻ हूवर टायपिंग: कमकुवत दृष्टी असणाऱ्या वापरकर्त्यांसाठी हूवर टायपिंग फिचर उपकारक असल्याचे सांगण्यात आले आहे. वापरकर्ते टाइप करतील तेव्हा स्क्रीनवरील फॉन्टचा आकार सामान्यपेक्षा मोठा होईल. वापरकर्ते फॉन्टसाठी आवडते रंगदेखील निवडण्यास सक्षम असतील. यासोबतच ॲपल फोन आणि आयपॅड वैशिष्ट्यपूर्ण उच्चार ओळखण्यास सक्षम असेल.

✻ ॲपल कार प्ले- या नवीन अपडेटनंतर ॲपल कार प्ले व्हॉईस कमांडने ऑपरेट करता येणार आहे. यासोबतच ऐकू न येणाऱ्या वापरकर्त्यांसाठी ॲपल व्हिजन-प्रो मध्ये लाइव्ह कॅप्शन फीचर सुरू करण्यात येत आहे.

**ठिपके जुळवा**



**जिज्ञासा**

## ओळखा पाहू...

१) इंद्रधनुष्यातला पहिला रंग कोणता?
२) न्यूझिलंडचा शेजारी देश कोणता?
३) जंगलबुक मधल्या अस्वलाचं नाव काय?
४) जायंट पांडांचं मुख्य अन्न कोणतं?
५) एका सहस्रकात किती वर्षं असतात?
६) त्रिकोणाला किती बाजू असतात?
७) इंग्लंडची राजधानी कोणती?
८) जून महिन्यात किती दिवस असतात?
९) रिओ ऑलिंपिकमध्ये भारताला पदक मिळवून देणारी बॅडमिंटनपटू कोण?
१०) होनोलूलू कोणत्या देशाची राजधानी आहे?

उत्तरं: १) लाल, २) ऑस्ट्रेलिया ३) बलू ४) बांबू ५) १००० ६) तीन ७) लंडन ८) ३० ९) पी. व्ही. सिंधू १०) अमेरिका

# सजावटीचा आकर्षक फंडा

**करून पहा**

दोस्तांनो, आता लवकरच सणासुदीचे दिवस सुरू होतील. या सणांच्या दिवसांमध्ये आपण घरामध्ये छान सजावट करतो. दरवर्षी वेगळी काय सजावट करायची असा प्रश्न आपल्याला पडतो. कधी-कधी साध्या सोप्या वस्तूंमधूनही खूप छान सजावट करता येते. पण या दिवसांमध्ये बाकीची तयारी सुरू असल्यामुळे आपल्याला घर सजावटीच्या वस्तू घरच्या घरीच तयार करण्यासाठी वेळ देता येत नाही. वेळ मिळेल तसा या वस्तू आपण तयार करून ठेऊ शकतो. झटपट आणि इको फ्रेंडली सजावट करायची असेल तर हा सुंदर कँडल होल्डर तयार करता येईल.



**साहित्य** : टेराकोटाची छोटी कुंडी वा हंडी, वॉटर किंवा ॲक्रेलिक रंग, छोटा दिवा किंवा मेणबत्ती, सजावटीच्या वस्तू इत्यादी.

**कृती** : टेराकोटाच्या कुंडीवर आवडीचं नक्षीकाम करा. ॲक्रेलिक रंग, मणी, टिकल्या लावून सजावट करता येईल. फुलांची सजावट करता येईल. आता या कुंडीत मेण घालून मेणबत्ती तयार करता येईल. थोडं हटके करायचं असेल तर त्यात छोटा दिवा ठेवता येईल. असे दिवे तयार करून तुम्ही सजावट करू शकता. हे दिवे भेट म्हणूनही देता येतील. रंगीत कागद किंवा इतर साहित्याचा वापर करून तुम्ही छान सजावट करू शकता. मग वाट बघू नका. झटपट कामाला लागा.

# जपा स्वत:ला!

**हेल्थ इज वेल्थ**

बालमित्रांनो, आता बऱ्याच ठिकाणी मान्सूनची सुरूवात झाली आहे. काहींना हा ऋतू आवडतो तर काहींना त्याचा तिटकारा येतो. या पावसामध्ये भिजण्याचा आनंद लुटण्याबरोबरच आरोग्याची काळजी घेणे तितकेच गरजेचे असते. तर पावसाळ्यात निरोगी राहण्यासाठी काय करायचे, जाणून घेऊ या...

✻ पावसाळ्यात प्रतिकारशक्तीच्या कमतरतेमुळे बरेच आजार डोके वर काढतात. तसेच वातावरणामध्ये जास्त ओलावा असल्याने खोकला, सर्दी आणि तापाचा त्रास होऊ शकतो. हे होऊ नये यासाठी सूपमध्ये लसूण घालणे आणि चहामध्ये आले घालणे यासारखे काही घरगुती उपाय करून पाहू शकता.



✻ कडू भाज्या खाण्याचे अनेक फायदे असतात आणि म्हणूनच तुमच्या रोजच्या जेवणात त्या समाविष्ट करणे आवश्यक आहे.

✻ पावसाचे साचलेले पाणी गंभीर आजारांना कारणीभूत ठरू शकते. म्हणूनच त्यात खेळणे टाळावे. टाकी, वॉटर कूलर आणि फुलांच्या भांड्यांमधील पाणी वेळोवेळी स्वच्छ करावे.

✻ पावसाळ्यात दुधामुळे होणारे अपचन टाळण्यासाठी तुम्ही कॉटेज चीज, ताजे दही आणि ताक यांसारखे दुग्धजन्य पदार्थ निवडू शकता. ही उत्पादने पचन सुधारण्यास आणि तुम्हाला निरोगी ठेवण्यास मदत करतील.

✻ हंगामात येणारी सर्व फळे खाणे ही एक चांगली सवय आहे. कारण प्रत्येक फळापासून मिळणारी पोषक तत्वे आरोग्यासाठी लाभदायक असतात. त्यासाठी आहारात नाशपाती, आंबा, सफरचंद आणि डाळिंब यासारख्या फळांचा समावेश करू शकता.

**रंगवा**



# जीव वाचवायचा तर...

**छान छान गोष्टी**

खूप वर्षांपूर्वीची गोष्ट आहे ही. डोंगरकाठच्या एका मोठ्या तळ्यात सहस्रबुद्धी आणि सतबुद्धी नावाचे मासे राहत होते. एकबुद्धी नावाच्या एका बेडकासोबत त्यांची मैत्री होती. हे तिघं मित्र एकमेकांसोबत बराच वेळ घालवत असत. तळ्याच्या काळावर त्यांची मैफल जमायची. एका संध्याकाळी हे तिघे मित्र तळ्याकाळी जमले होते. त्याच वेळी त्यांना मच्छीमार येताना दिसले. त्यांच्याकडे मासे पकडण्याची जाळी होती. इतरही काही साहित्य होतं. त्यांच्याकडे दोन मोठ्या टोपल्या होत्या. या टोपल्यांमध्ये त्यांनी पकडलेले मासे ठेवले होते. हे मच्छीमार त्या तळ्याजवळ आले. तळ्यात भरपूर मासे असल्याचं त्यांना दिसलं. एक मच्छीमार दुसऱ्याला म्हणाला, 'उद्या आपण इकडे येऊ या, असं त्यांच्यातल्या एकाने दुसऱ्याला सांगितलं. हे तळं फार खोलं नाही. तसंच यात भरपूर मासे आहेत. आपण इथे कधीच मासे पकडले नाहीत. त्यामुळे इकडेच यायचं' मग ते दोघं घरी गेले.



या मच्छीमारांचं बोलणं बेडकाने ऐकलं. तो खूप घाबरला. आता हे मच्छीमार येऊन मासे पकडणार असल्याने तो काळजीत पडला. आपण लपायचं की पळून जायचं हे ठरवण्याची गरज असल्याचं त्याने माशांना सांगितलं. हे मच्छीमार फक्त बोलले आहेत. उद्या येतीलच असं नाही आणि आलेच तरी माझ्याकडे पळून जाण्याच्या अनेक युक्त्या आहेत असं एका माशाने बेडकाला सांगितलं. दुसऱ्या माशानेही हेच सांगितलं. बेडकाला काही हे मान्य झालं नाही. पुढचा धोका दिसत असल्याचं त्याने मित्रांना सांगितलं. पण मासे ऐकायला तयार नव्हते. माशांनी त्याची मस्करी केली. बेडूकाने ते तळं सोडलं. दुसऱ्या दिवशी मच्छीमार आले. त्यांनी तळ्यात जाळं टाकलं. अनेक मासे, बेडूक, खेकडे, कासवं त्यात अडकले. सहस्रबुद्धी आणि सतबुद्धीही त्यात होते. दोघेही मरून पडले. एकबुद्धीने मात्र हुशारीने स्वत:चा जीव वाचवला. संकटकाळी सुरक्षित ठिकाणी जाणं अधिक योग्य असल्याची शिकवण यातून घेता येईल.




# 'मायरा वायकूळ' नावाचा झंझावात







श्रीराम शेटये

सुटाबूटातले दोन उद्योगपती काळ्या धंद्यातील बादशहा डावर सेठ आणि जयचंद रस्त्यावर फुटपाथवर बूट पॉलिश करणाऱ्या एका मुलाजवळ बूट पॉलिश करून घेतात. जयचंद बूट पॉलिश करून झाल्यावर पैशाचे नाणे बूट पॉलिश करणाऱ्या मुलाच्या पुढ्यात फेकतो. मुलगा ताडकन उभा रहातो. सात आठ वर्षाचा मुलगा पण अत्यंत आक्रमक होऊन पैसे फेकणाऱ्याला बजावतो. ''सेठ पैसे हात मे उठाकर देना फेका हुआ पैसा मै नही उठाता । मै अपने मेहनत का पैसा ले रहा हू , कोई भिक नहीं मांग रहा हू ।''

तेव्हा डावर सेठ जयचंदला सांगतो ''जयचंद पैसे उठाके के दे दो। यह लंबी रेस का घोडा है एक दिन यह लडका बहूत आगे निकल जायेगा। यह जिंदगीभर बूट पॉलिश करता नही रहेगा । एक दिन यह बच्चा सबसे आगे निकल जायेगा। ''

दिवार चित्रपटातला हा प्रसंग आणि विजय (अमिताभ बच्चन) मग मोठा झाल्यावर सगळ्या काळे धंदे करणाऱ्यांना कसे झोडपून काढतो ते त्यात दाखविण्यात आले आहे. बूट पॉलिश करणारा विजय काळ्या धंद्यात पारंगत झाल्यावर डावरला भेटायला जातो, तेव्हा डावर सेठ काही पैसे कामासाठी त्याला ॲडव्हान्स देतो. पैसे विजयच्या पुढ्यात फेकतो तेव्हा विजय (अमिताभ) म्हणतो.'' डावर साहब कुछ साल पहले आप रेस खेलने जाया करते थे हमेशा एक जगह रुक के बूट पॉलिश करवाते थे डावर साहब मै आज भी फेका हुआ पैसा नही उठाता।''

मायरा वायकूळला जेव्हा मी प्रथमच 'माझी तुझी रेशीम गाठ' या मराठी सिरीयलमध्ये भूमिका करीत असताना पाहिले तेव्हाच मला अंदाज आला होता. '' यह लंबे रेस की घोडी है ।'' अत्यंत सामान्य मध्यमवर्गीय कुटुंबात जन्माला आलेली ही मुलगी आपल्या वयाच्या मुलींपेक्षा कित्येक पटीने बुद्धिमान आणि समजदार आहे. मी काय बोलतोय ते लक्षात ठेवा. हेच कारण आहे की आज तिला अनेक स्तरातून ट्रोल केले जात आहे. मायराची अभिनय क्षमता मायराचा बेधडकपणा, मायराचे संवाद फेकण्याचे कौशल्य, मायराची लोकप्रियता सगळेच काळाच्या पलिकडे आहे. वादातीत आहे. मायराची अभिनय क्षमता आपल्या उमेदीत ताशी दिडशे किलोमीटर वेगाने गोलंदाजी करणाऱ्या पाकिस्तानचा जलदगती गोलंदाज वकार युनूस सारखी खतरनाक आहे. किंवा वेस्टइंडीजच्या माल्कम मार्शल सारखी भेदक आहे.

मायराची अभिनय क्षमता तिचे वाक्चातुर्य तिचा हजरजबाबीपणा सर्व काही तिच्या असामान्य हृदयातून उपजतच निसर्गदत्त दैवी देणगी आहे. या आईवडीलांनी शिकविलेल्या गोष्टी नाहीत. पण इतक्या लहान वयात इतक्या प्रगल्भपणे मायरा बोलू शकते विचार करू शकते. अभिनय करू शकते समोरच्या लोकांना फेस करून सडेतोड व्यवहार चातुर्य दाखवू शकते. मुलाखतीत विचारलेल्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर समर्पक आणि मुद्देसुद देते ते विलक्षण आहे. पण ती स्वयंभू आहे. यावर कोणाचा विश्वास बसत नाही. मग सगळे तिच्या आईवडीलांना टारगेट करतात. सगळ्यांना वाटते आईवडीलच हिला सर्व शिकवतात.

पण लता मंगेशकर, सचिन तेंडुलकर सारखे महान भारतरत्न ज्या महाराष्ट्रात आणि देशात जन्माला आले तेथे मायरासारखा एखादा हिरा जन्माला येणारच.

परंतु मायराचे हे यश अनेकांच्या डोळ्यात खुपू लागले. त्यात मायरा लहान असल्यामुळे तिच्या आईवडीलांना दोष देण्यात येत आहे. मायरा स्वयंभू आहे तिला असे बोल तसे बोल असे सांगायची गरज नाही. तिला जे वाटते ते ती उपजतच करते, बोलते. पण लोकांना सारखे वाटत रहाते की हिचे आईवडील हिला असे करायला आणि बोलायला भाग पडतात.

दुसर कारण असे की सोशल मीडियावर आणि अभिनय क्षेत्रात ईतक्या लहान वयात मायराने जी गगनभरारी घेतली आहे ते बघून या क्षेत्रात संघर्ष करणाऱ्या अनेकांना तिचा मत्सर वाटतो. मायरा इतके यश इतकी लोकप्रियता आपण संपादित करू शकत नाही हे दुःख इतरांना आहेच. या द्वेशातूनच मायराला ट्रोल करण्यात येत आहे. परंतु इतक्या लहान निरागस मुलीला छळताना लाज नाही वाटत? अवघ्या सात वर्षाची मायरा निरागस आणि निष्पाप आहे. कितीही बुद्धिमान असली तरी शरीर इतके प्रगल्भ नाही. उमलती कळी आहे. ती हुशार आहे. आपला अभ्यास आपला गृहपाठ सर्व परफेक्ट आणि वेळच्यावेळी करीत आहे. अभ्यासातही तितकिच हुशार आहे जितकी अभिनय कला क्षेत्रात आहे.तिच्या बोलण्यात वागण्यात कुठे गर्व उद्दामपणा नाही. सडेतोड आणि समर्पक बोलणे म्हणजे उद्दामपणा नाही. प्रसिद्धीची हवा तिच्या डोक्यात गेलेली नाही.

इतक्या लहान वयातही ती अचूक वागत आहे. एक दिवस लता दीदी, सचिन तेंडुलकर यांच्यासारखी हीसुद्धा आपल्या देशाचे नाव काढणार आहे. परंतु मायराचे हे यश ज्यांच्या डोळ्यात खुपते असे लोक मायराला ट्रोल करीत आहेत. एवढ्या निरागस लहान मुलीला ट्रोल करणारे सुज्ञ आणि वयस्कर लोक आहेत. तिचे रील्स तुम्हाला आवडत नसतील तर नका पाहू. परंतु ती आगावू आहे. ती डोक्यात जाते. तिचे आईवडील पैशासाठी तिचा वापर करतात. असले आरोप करणे हा निव्वळ कांगावा आहे. या शब्दांच्या पाठीमागे प्रचंड द्वेश आणि जळफळाट दडलेला आहे.

मायराला आणि तिच्या आईवडीलांना एवढच सांगेन. लोकांच्या प्रतिक्रिया वाचून जराही विचलित होऊ नका. हा महाराष्ट्र छत्रपती शिवाजी रहाराजांचा आहे. शाहू फुले आंबेडकरांचा आहे. याच महाराष्ट्रात महात्मा फुले यांनी मुलींची पहिली शाळा सुरु केली. ज्योतीबा फुले यांच्या पत्नी सावित्रीबाई मुलींच्या शाळेच्या पहिल्या शिक्षिका होत्या.

तेव्हाही मुलींच्या शिक्षणाला खुप विरोध झाला. सावित्रीबाई रस्त्याने शाळेत शिकवायला जाताना समाजकंटकांनी त्यांच्या अंगावर चिखल फेकला. दगड धोंडे फेकले पण ज्योतीबा फुलेंनी हार मानली नाही. त्यांनी क्रांती घडविली नसती तर आज स्त्रियांना शिक्षण मिळाले नसते. समाजात काही झुंडशाही करणारे लोक आहेत. त्यांना दुसऱ्याचे यश पाहवत नाही. मायरा सारख्या सात वर्षाच्या निरागस मुलीवर तुटून पडणाऱ्यांना सोशल मिडीयावरच्या ट्रोलर्सना बिभत्स नागडे उघडे रील्स दिसत नाहीत का? की जाणीवपूर्वक डोळेझाक करून घ्यायची? विशेष म्हणजे अभिनय क्षेत्रातले लोकही रायराच्या पाठीशी उभे राहाण्याऐवजी तिला ट्रोल करण्यात आघाडीवर आहेत. इतक्या लहान वयात मायराला मिळत असणारे यश पाहून यांच्या मनात मत्सर निर्माण झाला आहे हेच सत्य आहे. एकविसावे शतक आले तरी महाराष्ट्रातील झुंडशाही प्रवृत्तीच्या लोकांचे विचार आजही बदलत नाहीत याचे वैषम्य वाटते.केवळ संन्यास घेऊन परत संसार केला म्हणून ज्ञानेश्वर माऊलींच्या वडीलांना देहदंड घेण्यास भाग पाडणार समाज. लोकांच्या निंदेला कंटाळून स्वत:ला माऊलींनी घरात कोंडून घेतले होते. तिथे निष्पाप निरागस मायराला किती त्रास होत असेल या सर्वाचा?


मायरा साध्या मध्यमवर्गीय कुटुंबात जन्माला आलेली मुलगी आहे. तिला इंडस्ट्रीत कोणी गॉड फादर नाही. म्हणूनच तीला एवढा त्रास दिला जातोय. तिच्या जागी करीना,करीष्मा असती तर नसता झाला त्रास. नाच ग घुमा हा चित्रपट, एक हिंदी मालिका असा चढत्या कमानीचा प्रवास मायरासाठी निश्चितच यशाच्या मार्गावर घेऊन जाणारा आहे.मायरा निडर मुलगी आहे. ती आपल्या कामाने ट्रोलर्सची तोंडे बंद करेल. आई वडीलांनी न डगमगता तिला साथ द्यायला हवी. समाजानेही पाठीशी उभे रहायला हवे. ●●

## महाराष्ट्राला मनोरंजनाचा खजाना बहाल करणाऱ्या
# 'हलगट' चित्रपटाचा पोस्टर झाला लाँच

प्रतिनिधी

नव्या विषयांवर आधारीत आशयघन चित्रपटांमुळे मराठी सिनेसृष्टी अवघ्या जगभरात ओळखली जाते. एक वेगळा विषय घेऊन मनोरंजनाने ठासून भरलेला 'हलगट' चित्रपटाचा पोस्टर दिनांक १२ जून २०२४ रोजी दणक्यात लाँच झाला आहे. पोस्टरमध्ये दिसणारं एक पात्र हातात सोन्याचे दागिने घेऊन कुत्सित स्मित देताना दिसत आहे. पात्राच्या डोळ्यांवर असणाऱ्या गॉगलमध्ये एका बाजूला एक पुरुष आणि दुसऱ्या बाजूला एक स्त्री विशिष्ट गोष्टीला अनुसरून आशेने बघताना दिसत आहे. एकूणच पोस्टर सोनेरी रंगाने माखलेला दिसत असून एक गूढ आणि रहस्यमय गोष्टीकडे आकर्षित करत आहे.

कर्णन फिल्म्स निर्मित आणि आयमॅक्स टिव्ही डिजिटल प्रस्तुत हलगट चित्रपटाचे दिग्दर्शन करण सुमन अर्जुन या दिग्गज दिग्दर्शकाने केले आहे. बाबुराव केशव घोंगडे, अभिजीत सांघवी, जीवन माधव लहसे आणि करण सुमन अर्जुन हे चित्रपटाचे निर्माते असून गणेश अवारी हे सह-निर्माते आहेत. चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद अभिजीत कुलकर्णी, छायाचित्रण अन्सार खान, संकलन संतोष घोठोस्कर, निर्मिती व्यवस्थापक विष्णू घोरपडे, संगीत निलेश पाटील, गीत पद्माकर मलकापुरे, पार्श्वसंगीत अजिंक्य जैन, पब्लिसिटी डिझाईन श्री. दत्तात्रय मुसळे, वेशभूषा प्रणिता चिंदगे, रंगभूषा पूजा विश्वकर्मा, कला दिग्दर्शन जगदीश, पोस्ट प्रोडक्शन जयेश मलकापूरे अशा या टीमने चित्रपटाच्या सर्वांगीण बाजू भक्कमपणे पार पाडले आहे. आपल्या आसपास घडणाऱ्या गोष्टी आणि वावरणारे सामान्य पात्र जेव्हा मोठ्या पडद्यावर चित्रपटाच्या रूपात दिसतात, तेव्हा त्यातली मनोरंजकता जाणून येते. अशाच सामान्य पात्रांची असामान्य गोष्ट 'हलगट' लवकरच प्रदर्शित होऊन रसिक प्रेक्षकांची उत्कंठा वाढवणार यात शंका नाही. ●●



# 'अध्यात्म' ज्ञानामुळे माझा अभिनय आणि मी प्रगल्भ होतोय! : अभिनेता प्रसाद ताटके

राम कोंडीलकर

**'अभिनय' आणि 'अध्यात्म' या बळावर अभिनेते प्रसाद ताटके यांनी असंख्य मालिकांमधून आपला वेगळा ठसा उमटवायला आहे. 'भैरोबा', 'काटा रुते कुणाला', 'कन्यादान', 'लक्ष', 'स्वप्नांच्या पलीकडले', 'माधुरी मिडलक्लास', 'क्राईम डायरी', 'श्री स्वामी समर्थ', 'दूर्वा', 'प्रेमास रंग यावे', 'स्वराज्यारक्षक संभाजी', 'स्वराज्यजननी जिजामाता', 'सुखी माणसाचा सदरा', आणि आता नवीन चालू होणारी 'अंतरपाट' अशी प्रातिनिधिक नावे घेता येतील. तसेच नाटकांमध्ये 'अजब तुझे सरकार', 'संगीत सन्यस्त खड्ग' आणि चित्रपटांमध्ये केदार शिंदे दिग्दर्शित 'महाराष्ट्र शाहीर', आगामी 'दिल मलंगी' अशा काही मराठी चित्रपटांमध्ये या हरहुन्नरी कलावंताने विविध पैलू असलेल्या अनेक भूमिकांतून रसिकांचे मनोरंजन केले आहे. अभिनयासोबतच ते अनेक स्टेज शोंचे निवेदन - सूत्रसंचालन देखील करतात. यासोबतच ते सत्यनारायण पूजा, सर्व शांती कर्म म्हणजेच पौरोहित्य तसेच श्री स्वामींच्या मठात गुरुजी म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या आगामी चित्रपट, मालिकांमधून विविध छटा असलेल्या भूमिकांमध्ये ते रसिकांना दिसणार आहेत. त्यांच्याशी साधलेला हा संवाद...**

**प्रश्न १ : प्रसादजी आपली अभिनय क्षेत्रात सुरुवात कशी झाली? आवड म्हणून कि व्यवसाय म्हणून?**


अभिनेता प्रसाद ताटके : अर्थात आवड म्हणून! पण पुढे काही चांगली काम मिळाली आणि हळूहळू अध्यात्मासोबतच अभिनयात रमू लागलो. स्वामीकृपेने सध्या दोन्हीं क्षेत्रांमध्ये काम करीत आहे.

**प्रश्न २ : आपण अभिनय करू शकतो केव्हा समजले? गॉडफादर कोणाला मानता?**

अभिनेता प्रसाद ताटके : हे अभिनयाचे गुण कोंकणवासियांत उपजत आहेत, त्यामुळे लहानपणापासून स्टेजचे आकर्षण कायम होते. गॉडफादर म्हणाल तर मराठी मध्ये उपेंद्र लिमये, सुबोध भावे, प्रसाद ओक, प्रसाद खांडेकर, दिलीप प्रभावळकर, अशोक सराफ, सदाशिव अमरापूरकर, विनय आपटे सर यांसह अनेक दिग्गजांच्या अभिनयाने प्रेरणा मिळत आहे.

**प्रश्न ३ : अध्यात्म आणि अभिनय यात निवडायचे झाल्यास कशाची निवड कराल?**

अभिनेता प्रसाद ताटके : अध्यात्म आणि अभिनय हे दोन्ही माझे आहे. त्यामुळे मी दोन्हीमध्ये रमतो. अभिनयाला अध्यात्माची जोड असेल तर आधिक फायद्याचे होते. अध्यात्मात भाषा, उच्चार, आवाजाचा पोत, सादरीकरण यांवर प्रभुत्व गाजवता येते, आणि अभिनय कलेसाठी हे महत्वाचे असल्याने, मी दोन्ही कलेत पारंगत होण्यासाठी प्रयत्न करीत असतो.



**प्रश्न ४ : अभिनयात करियर करायचं ठरवलं तेव्हा कोणती आव्हाने समोर होती? त्यांना कसे सामोरे गेलात?**

अभिनेता प्रसाद ताटके : सुरवातीला खूप हालपेष्टा सहन कराव्या लागल्या, आजही आव्हान समोर आहेतच. पण आता थोडा मार्ग मोकळा होत चाललाय. छान छान भूमिका करायला मिळत आहेत. आपलं काम लोकांपर्यंत पोहचू लागलय याचा आनंद होतोय.

**प्रश्न ५ : आजवरचा या क्षेत्रातील अनुभव कसा होता? आवडीचे काम मिळावण्यासाठी काय काय करावे लागले?**

अभिनेता प्रसाद ताटके : आजपर्यंतचा अनुभव खूप छान आहे. इतर कलाकारांना जशी वागणूक सुरवातीला मिळते तस माझ्या बाबतीत शक्यतो झाले नाही. यामध्ये अर्थातच माझ्या आईवडिलांचा आशीर्वाद आणि मघाशी म्हणालो तसं अध्यात्माची जोड यामुळे अनेक मालिका, नाटकांमध्ये भूमिका मिळत गेल्या. इतर कलाकारांना जसा त्रास होतो तसा सुदैवाने मला झाला नाही. स्वामी समर्थांच्या आशीर्वादामुळे खूप कमी कालावधीत मिळतोय. जो काही संघर्ष सुरु आहे तो आव्हानात्मक भूमिका मिळविण्यासाठी.

**प्रश्न ६ : आजवर तुम्ही कोणत्या कोणत्या भूमिका केल्या आहेत?**

अभिनेता प्रसाद ताटके : आजवर मी गुरुजी, डॉक्टर, हवालदार, ऑफिस मॅनेजर, अशा वेगवेगळ्या भूमिका केल्या आहेत. 'महाराष्ट्र शाहीर' मधील भूमिकेचे विशेष कौतुक झाले आहे. तसेच सुनील परब दिग्दर्शित आणि रमाकांत भोसले यांच्या सद्गुरू एंटरटेनम ेण्टच्या 'दिल मलंगी' मध्ये एक अफलातून भूमिका करत आहे. असे असले तरी मला आगामी काळात निगेटिव्ह भूमिका आव्हानात्मक वाटत असून अश्या भूमिका करायला जास्त आनंद होईल.

**प्रश्न ७ : केदार शिंदे यांच्यासोबत महाराष्ट्र शाहीर करतानाचा अनुभव कसा होता?**

अभिनेता प्रसाद ताटके : फार छान, वेगळी अनुभूती देणारा. देशासाठी आपल्या पिढीने किती त्यागलंय तो काळ या निमित्ताने अनुभवायला मिळत होता. केदार शिंदे सर कलावंतांकडून त्यांना हवा असलेला अभिनय सहज करून घेतात. ते अतिशय शिस्तप्रिय आहेत. स्वामीभक्त असल्याने आमच्यात सहज ट्युनिंग जमले. ●●

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)